



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २३५ * नांदेड * गुरूवार, दि. ३ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# तुम्हाला यायचं असेल तर सगळे जीआर काढून या -मनोज जरांगे पाटील

**जालना (प्रतिनिधी)–** आपल्या वाट्याला गेले तर मी सोडत नसतो, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला इशारा दिला. तसेच, विखे पाटील आणि सावंत डोक्यावर पडले आहेत का? गोळ्या सुरू आहेत का त्यांना? चांगला रिस्पॉन्स कसा असतो नरड्यात हात घालायचा का तुमच्या? आम्ही तुम्हाला येऊ नका म्हणलो का? असे म्हणत सरकारच्यावतीने जी बोलणी सुरू आहेत, त्यावरही जरांगे पाटलांनी भाष्य केलं. तुम्हाला यायचं असेल तर सगळे जीआर काढून या, असेही पाटलांनी म्हटले.

अंतरवाली सराटीत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा बुधवारी पाचवा दिवस होता. त्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्यावतीने मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषद घेऊन मराठा



आरक्षण आणि शासनाने घेतलेल्या निर्णयाबाबत माहिती दिली. तसेच, शिंदे समिती पुन्हा एकदा अंतरवालीत दौरा करणार असून चर्चा करण्यात येईल, असेही सांगितले. दरम्यान, यावेळी, राधाकृष्ण विखे पाटलांनी नाव न घेता थेट शरद पवारांकडे बोट दाखवलं. १९९४ साली मंडल आयोगात हे टाकलं असतं तर आज ही वेळ आली नसती, हे सगळं त्यांचं पाप आहे, असेही विखे पाटलांनी म्हटले. त्यावर, आता जरांगे पाटलांनी उत्तर दिलं आहे.

राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून नाव न घेत शरद पवारांच्या मुख्यमंत्रीपदाच्या काळातील उल्लेख करण्यात आला होता. तसेच, १९९४ सालच्या मुख्यमंत्र्यांचं हे पाप आहे,असेही विखे पाटलांनी म्हटले होते, त्यावरूनही जरांगे पाटलांनी सुनावलं. तुम्हाला तेच भांडण लावायचं आहे शरद पवार होते आणि कोणी होतं. त्यांनी वाटोळ केलं आमचं, तुम्ही काय कमी केलं का? असा सवाल जरांगे पाटील यांनी राधाकृष्ण विखे पाटलांना विचारला. तसेच, आता तू शिफारस कर, तू मराठ्याचा देव, लोकाकडे कशाला बोट दाखवतो. आता, १२ तारखेपर्यंत वाट बघणार आहे, असे म्हणत विखे पाटलांवरही जोरदार हल्लाबोल केला.

### विखे पाटील-सामंत यांची पत्रकार परिषदेतून माहिती

मराठवाड्यातील कुणबी प्रमात्रपाच्या ५८ लाख नोंदीचा जो मुद्दा आहे, त्यावर त्यांना कार्यवाही अपेक्षित आहे, या प्रक्रियेमध्ये शिंदे समितीपूर्वी हजार सुद्धा दाखले नव्हते. मात्र, शिंदे समिती स्थापन झाल्यावर साडेतीन लाख प्रमाणपत्र शासनाने दिले. न्याय द्यायला हे पाऊल उचलले होते. मराठा समाजाला न्याय द्यायला गायकवाड आयोग स्थापन केला, १६ टक्के आरक्षण दिले, मात्र महाविकास आघाडी सरकारमध्ये ते आरक्षण टिकले नाही, अशी माहिती राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत यांनी दिली. पहिला प्रयत्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला होता, हे लक्षात घ्यायला हवे. त्यानंतर, एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले त्यांनी १० टक्के आरक्षण दिले, यापूर्वी असे प्रयत्न या दोघांशिवाय कुणीही केले नसल्याची माहितीही पत्रकार परिषदेतून देण्यात आली. तसेच शिंदे समिती पुन्हा एकदा अंतरवालीत दौरा करणार असून चर्चा करण्यात येईल, असेही सांगितले.

## दिशा सालियान मृत्यू प्रकरणात हायकोर्टाचा निर्णय, सीबीआयला तपासाचे आदेश

**मुंबई (प्रतिनिधी)–** दिशा सालियान या तरुणीच्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीबाबत दाखल असलेल्या याचिकेवर मंगळवारी हायकोर्टाने आपला निकाल सुनावला. मुंबई हायकोर्टाने या प्रकरणातील पक्षकारांची बाजू ऐकल्यानंतर निकाल देताना सीबीआयला तपास करण्याचे आदेश दिले आहे. या प्रकरणात जबाब नोंदवावेत आणि सीबीआयने तपासाला सुरुवात करावी असे निर्देश हायकोर्टाने दिले आहेत. मात्र, त्याच वेळेस जबाब नोंदवताना सीबीआयने कोणालाही आरोपी असल्यासारखी वागणूक देऊ नये अशीही सूचना केली.

दिशा सालियान मृत्यू प्रकरणाने राज्याचे राजकारणही ढवळून निघाले होते. भाजप नेत्यांकडून शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांच्याविरोधात आरोपांची राळ उडवण्यात आली होती. दिशा सालियान यांच्या वडिलांनी आपल्या मुलीच्या मृत्यू प्रकरणाची चौकशी सीबीआयकडून करावी, यासाठी याचिका दाखल केली होती.

## शिवसेनेतील अधिकार एका व्यक्तीकडे केंद्रीत केले; सर्वोच्च न्यायालयात शिंदेंच्या वकिलांचा युक्तिवाद

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाबाबत सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणी दरम्यान शिवसेनेच्या वतीने बुधवारी ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल यांनी पक्षाच्या संघटनात्मक इतिहासाची आणि पक्षघटनेतील बदलांची सविस्तर पार्श्वभूमी न्यायालयासमोर मांडली. १९९७ पासून निवडणूक आयोगाने शिवसेनेमध्ये अंतर्गत लोकशाही आणि संघटनात्मक निवडणुकांबाबत घेतलेली भूमिका तसेच १९९९ आणि २०१८ च्या पक्षघटनेतील मूलभूत फरक त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

कौल यांनी युक्तिवाद केला की, उद्धव ठाकरे गट आज ज्या संघटनात्मक रचनेच्या आधारे पक्षावरील अधिकाराचा दावा करीत आहे, ती रचना निवडणूक आयोगासमोर १९९९ मध्ये असलेल्या पक्षघटनेपेक्षा मूलभूतरीत्या बदललेली होती. २०१८ मधील बदलांमुळे पक्षप्रमुखांकडे मोठ्या प्रमाणावर अधिकार केंद्रीत झाल्याचा मुद्दाही त्यांनी मांडला. तसेच निवडणूक आयोगाच्या १९९७ मधील नोंदीनुसार, त्या काळातील ४३ मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकीय पक्षांपैकी ४२ पक्षांनी संघटनात्मक निवडणुका घेतल्या होत्या. शिवसेना मात्र एकमेव अपवाद होती असा दावा कौल यांनी केला.

### आम्ही दुसऱ्या पक्षात गेलो नाही, आम्ही शिवसेनेतच आहोत -एकनाथ शिंदे

आम्ही दुसऱ्या पक्षात गेलो नाही. आम्ही शिवसेनेमध्येच आहोत आणि शिवसेनेचाच मुख्यमंत्री झालेला आहे. आम्ही कुठल्या तिसऱ्या पक्षात गेलो नाही, पक्षांतर केलं नाही. आम्ही बहुमताने शिवसेना पक्षामध्येच राहिलो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्ली येथे पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले.

## भूमी अभिलेख कार्यालयात लाचखोरीचा पर्दाफाश; लाच घेताना शिपाई जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** शेतजमिनीच्या मोजणीचा अहवाल न्यायालयात पाठवण्यासाठी १५ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या मुखेडच्या भूमी अभिलेख कार्यालयातील शिपायाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे.

७२ वर्षीय तक्रारदारांच्या पत्नीच्या नावे मुखेड येथील गट क्र. ६१ मध्ये ५३ आर जमीन आहे. मोजणीसाठी न्यायालयात अर्ज केल्यानंतर दि. ६ जुलै रोजी निमतानदार सय्यद इमरान इकबाल व शिपाई विवेकानंद खुडे हे शेतात आले होते. अहवाल पाठवण्यासाठी पैशांची मागणी केली होती.

दि. २ सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० ते १ वाजता पडताळणी केली असता शिपाई विवेकानंद खुडे याने निमतानदार सय्यद इमरान यांच्यावतीने १५ हजार रुपये लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर त्याच दिवशी दुपारी ३.३० ते ४ वाजता भूमी अभिलेख कार्यालय, मुखेड येथे सापळा रचून शिपाई विवेकानंद पांडुरंग खुडे (वय ३५, रा. खुडेवाडी, ता. कंधार) याला १५ हजार रुपये लाच घेताना ताब्यात घेण्यात आले.

या प्रकरणी मुख्य आरोपी सय्यद इमरान सय्यद इकबाल, निमतानदार, भूमी अभिलेख मुखेड आणि विवेकानंद खुडे, शिपाई यांच्याविरुद्ध मुखेड पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, १२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक राहुल तरकसे, पोलीस निरीक्षक माधुरी यावलीकर, पोहेकॉ राजेश राठोड, बालाजी मेकाले, पोकॉ सय्यद खदीर, चालक प्रकाश मामुलवार यांनी ही कारवाई केली.

## मराठा आरक्षण: आज नांदेड जिल्हा बंदची हाक

### मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ सकल मराठा समाज आक्रमक

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी, जि. जालना येथे सुरू आहे. या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्यावतीने आज गुरूवार, दि. ३ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

मनोज जरांगे पाटील हे दि. २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणास बसले आहेत. उपोषणाचा




पाचवा दिवस उलटूनही शासनाकडून मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर अपेक्षित तोडगा निघालेला नसल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. शासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी सकल मराठा समाजाच्यावतीने करण्यात आली आहे.

जरांगे पाटील यांच्या प्रकृतीबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. दीर्घकाळ सुरू असलेल्या उपोषणामुळे मनोज जरांगे पाटील यांच्या प्रकृतीवर त्याचा परिणाम होत असल्याबद्दल सकल मराठा समाजाने उपोषणाकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे आणि मराठा समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, यासाठी नांदेड जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले आहे.

जालना, परभणी, लातूर, बीड आदी जिल्ह्यातील समन्वयकांशी समन्वय साधून आज दि. ३ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्हा बंदची हाक देण्याचा निर्णय झाला आहे. अनावधानाने काही जणांनी दि. ४ सप्टेंबर ही तारीख जाहीर केली आहे. परंतु, मराठवाड्यातील मराठा समन्वयकांशी समन्वय साधून ३ सप्टेंबर ही तारीख निश्चित करण्यात आली आहे.त्यामध्ये कोणताही बदल करण्याचा अट्टाहास कोणी करू नये. आपली एकी हीच आपली ताकद आहे, सर्वांनी सामंजस्याची भूमिका घेत आजचा बंद यशस्वी करावा, असे आवाहन ही सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

## डीजेमुक्त पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करू या -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



**नांदेड (प्रतिनिधी)–** गणेशोत्सव व दहीहंडी उत्सव एकत्रित येत असून जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी परस्पर सौहार्द, शांतता व सर्वधर्मसमभाव राखून सण साजरे करावेत. नांदेड जिल्ह्यात डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करून पर्यावरण संरक्षणाचा वेगळा संदेश द्यावा, तसेच गणेश मंडळांनी विविध सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे गणेशोत्सव, दहीहंडी, पोळा व इतर सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज संपन्न झाली.

या बैठकीस आमदार अमर राजूरकर, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, मनपा अपर आयुक्त गिरीश कदम, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह शांतता समितीचे सदस्य, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी कर्डिले यांनी गणेशोत्सव काळात कोणालाही त्रास होणार नाही याची मंडळांनी दक्षता घ्यावी. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी डीजेचा वापर न करता डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करावा. नदीच्या वाहत्या प्रवाहात गणेशमूर्तींचे विसर्जन न करता कृत्रिम तलावांचा वापर करावा. घरगुती गणेशमूर्तींचे घरोघरी संकलन करण्याबाबतही प्रशासनाने नियोजन करावे, अशा सूचना दिल्या.

### नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये -पोलीस अधीक्षक

गणेशोत्सव शांततेत व सर्वधर्मसमभावाने पार पाडण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे. कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत याची दक्षता घ्यावी. सोशल मीडियावरील संदेश व पोस्टची सत्यता पडताळून पाहावी. उत्सव काळात कोणतीही दुर्घटना अथवा अनुचित प्रकार घडू नये यासाठी नागरिकांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. कोणत्याही नागरिकाने कायदा हातात घेऊ नये असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी केले. गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही व आवश्यक नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

### विसर्जनासाठी आवश्यक तयारी पूर्ण -मनपा अपर आयुक्त


गणेशोत्सवाच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्यावतीने आवश्यक नियोजन करण्यात आले आहे. मिरवणूक मार्गावरील अडचणी दूर करण्यासह विविध ठिकाणी गणेशमूर्ती विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली आहे. निर्माल्य व प्रसादाचे पावित्र्य राखण्यासाठी व्यवस्था, पथदिवे, विद्युत रोषणाई तसेच विसर्जनावेळी क्रेनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मनपा अपर आयुक्त गिरीश कदम यांनी दिली.

## '५८ लाख कुणबी नोंदींचा डेटा राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सुपूर्द'

**मुंबई (प्रतिनिधी)–** मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मराठा आरक्षणाबाबत आतापर्यंत केलेल्या प्रशासकीय कार्यवाहीची सविस्तर आकडेवारी बुधवारी जाहीर केली. मराठवाड्यात सुमारे साडेतीन लाख प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली असून, ५८ लाख नोंदींचा डेटा डिजीटल स्वरूपात जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती सरकारच्या शिष्टमंडळाने पत्रकार परिषदेत दिली.

जुन्या महसूल नोंदींच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र मिळवण्याच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीच्या माध्यमातून आतापर्यंत मराठवाड्यात साडेतीन लाख दाखले देण्यात आले आहेत. तसेच ५८ लाख नोंदींचा डेटा पेनड्राईव्हद्वारे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. या प्रक्रियेत नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी मंत्रालयात स्वतंत्र 'मराठा कक्ष' स्थापन करण्यात आला असून प्रत्येक जिल्ह्यात 'नोडल अधिकारी' नेमण्यात आला आहे. हैदराबाद गॅझेटनुसारही प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत ३ हजार ५०० अर्ज प्राप्त झाले आहेत.

याशिवाय, आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याच्या मागणीवर बोलताना सरकारने स्पष्ट केले की, आंदोलनादरम्यान दाखल झालेल्या १ हजार ५०९ गुन्ह्यांपैकी १ हजार ३७३ गुन्हे मागे घेण्यात आले आहेत. उर्वरित १०८ प्रकरणांची चौकशी सुरू आहे.




## इतवारा वाहतूक पोलिसांची विशेष मोहीम; २८ वाहनांवर दंडात्मक कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील वाढती वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशावरून इतवारा शहर वाहतूक शाखेने बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी विशेष कागदपत्र तपासणी मोहीम राबवली. या कारवाईत २८ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यासोबतच त्यांनी नांदेड भागातील रस्त्यावरील अतिक्रमण महानगरपालिकेच्या मदतीने काढले.

इतवारा विभागाचे शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक मिटके व त्यांच्या पथकाने जुना मोंढा, हबीब टॉकीज, देशपांडे हॉस्पिटल, बर्की चौक, किल्ला रोड, मन्यार गल्ली व देगलूर नाका परिसरात ऑटो रिक्षा व दुचाकींची तपासणी केली. या मोहिमेत युनिफॉर्म नसणे, फ्रंट सीट, परवाना, पीयूसी व इतर कागदपत्रे नसलेल्या वाहनांवर कारवाई करत एकूण २८ केसेस करून २६ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच ऑटो चालक व मालकांचे समुपदेशनही करण्यात आले.

दुसरीकडे इतवारा पोलीस स्टेशन समोरील मोहम्मद अली रोडवर रस्त्याच्या मधोमध होणाऱ्या दुचाकी व चारचाकी पार्किंगमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. वाहतूक पोलिसांनी सतत पेट्रोलिंग करून दंडात्मक कारवाई केली आणि महानगरपालिकेच्या टोइंग वाहनाच्या मदतीने बेशिस्तपणे लावलेली वाहने हटवून रस्ता मोकळा केला.

ही कारवाई अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि मिटके, पोउपनि मुखेडकर, ग्रे. पोउपनि सुधाकर कांबळे, सपोउपनि बिडगर, हवालदार ठाकूर, अविनाश राठोड, संजय जाधव यांनी पार पाडली.

## नांदेडमध्ये मध्यरात्री पोलिसांचे कॉम्बिंग ऑपरेशन; ९३ सराईत गुन्हेगारांची झाडाझडती

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने दि. १ सप्टेंबर रात्री ११ ते २ सप्टेंबर पहाटे ३ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात विशेष कॉम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले.

या मोहिमेत सराईत गुन्हेगार, अवैध शस्त्र बाळगणारे, हद्दपार-तडीपार, हिस्ट्रीशीटर तसेच पाहिजे व फरार आरोपींची सखोल तपासणी करण्यात आली.

या कारवाईत तडीपार/प्रस्तावित गुन्हेगार चेक -२६, एमपीडीएमधून सुटलेले गुन्हेगार चेक -५८, मालमत्ता व शरीराविरुद्धचे सराईत गुन्हेगार चेक -१९३, एकूण तपासलेले सराईत गुन्हेगार -९३, पाहिजे / फरार आरोपी अटक -२, कलम १२२ मपोका अन्वये गुन्हे -२, वॉरंट बजावणी बेलेबल -३७, नॉन बेलेबल -१६, समन्स बजावणी ५७ जणांना करण्यात आली आहे.

### २ फरार आरोपी जेरबंद

यादरम्यान संशयास्पद फिरणाऱ्या दोघांवर वजिराबाद ठाण्यात गु.क्र. ४३५/२०२६ कलम १२२ मपोका आणि भाग्यनगर पोलीस ठाण्यात गु.क्र. ४८७/२०२६ कलम १२२ मपोका दाखल करण्यात आला.

या मोहिमेत अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व ठाणे प्रभारी, स्थानिक गुन्हे शाखा व आरसीपी पथकाने सहभाग घेतला. जिल्ह्यात शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी अशा मोहिमा सातत्याने राबवल्या जातील, असे पोलीस दलाने स्पष्ट केले आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# उपचाराचा खर्च की कुटुंबाच्या आर्थिक अस्तित्वाची किंमत?

आरोग्यसेवा ही कोणत्याही कल्याणकारी राज्याची मूलभूत जबाबदारी मानली जाते. मात्र भारतात आज परिस्थिती अशी आहे की, उपचार मिळणे आणि उपचार परवडणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी बनल्या आहेत. आजाराशी लढताना रुग्णाला केवळ वेदनांचा सामना करावा लागत नाही, तर त्याचवेळी कुटुंबाच्या आर्थिक सुरक्षिततेचीही परीक्षा द्यावी लागते. आरोग्य विम्याचा विस्तार होत असल्याचे चित्र असतानाही नागरिकांच्या खिशातून होणारा आरोग्यखर्च कमी होत नसणे ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. आरोग्य आणि कुटुंबकल्याणविषयक संसदीय स्थायी समितीच्या १७६ व्या अहवालातील आकडेवारी या वास्तवावर प्रकाश टाकते. सरकारी रुग्णालयात दाखल होऊन उपचार घेण्यासाठी सरासरी ६,६३१ रुपये, तर त्याच स्वरूपाच्या उपचारासाठी खासगी रुग्णालयात तब्बल ५०,५०८ रुपये खर्च येतो. म्हणजे खासगी रुग्णालयातील उपचाराचा सरासरी खर्च सरकारी रुग्णालयापेक्षा सुमारे ७.६ पट अधिक आहे. देशातील आरोग्यव्यवस्थेतील विषमता किती खोलवर रुजली आहे, याचे हे स्पष्ट उदाहरण आहे. सरकारी रुग्णालये स्वस्त आहेत; पण ती नागरिकांसाठी सहज उपलब्ध आणि सक्षम आहेत का, हा खरा प्रश्न आहे. त्यावर लोकांचा विश्वासही कमी आहे. आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने केवळ नाईलाज म्हणून लोक त्या ठिकाणी जातात. सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेवर प्रचंड रुग्णभार आहे. अनेक रुग्णालयांत खाटांची कमतरता, डॉक्टर व परिचारिकांची अपुरी संख्या, अत्याधुनिक उपकरणांचा अभाव आणि पायाभूत सुविधांवरील ताण दिसून येतो. त्यामुळे उपचाराचा खर्च कमी असला तरी उपचार मिळण्यासाठी लागणारा वेळ मोठा ठरतो. गंभीर आजाराच्या वेळी वेळ हीच सर्वात मौल्यवान गोष्ट असते. कर्करोग, हृदयरोग, मूत्रपिंडाचे विकार, अपघात किंवा प्रसूतीसारख्या प्रसंगी रुग्णाच्या कुटुंबाकडे प्रतीक्षा करण्याचा पर्याय नसतो. परिणामी, खासगी रुग्णालय हा अनेकदा निवडीचा नव्हे, तर परिस्थितीने लादलेला पर्याय ठरतो. याच ठिकाणी आरोग्यसेवा आणि आर्थिक विषमता यांचा संबंध अधिक स्पष्ट होतो. ज्यांच्याकडे पैसा आहे त्यांना वेळेवर उपचार मिळण्याची शक्यता अधिक; तर आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना उपचार मिळवण्यासाठीच संघर्ष करावा लागतो. खासगी रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, आधुनिक उपकरणे आणि चोवीस तास सेवा उपलब्ध असते. त्यासाठी अधिक खर्च होणे स्वाभाविक आहे. परंतु अधिक खर्च म्हणजे अधिक चांगली वैद्यकीय सेवा, असे समीकरण मान्य करता येणार नाही. अशा ठिकाणी आर्थिक पिळवणूक होण्याची शक्यता जास्त असते. अनावश्यक तपासण्या, औषधांच्या किंमतीतील तफावत, विविध सेवांसाठी आकारले जाणारे अतिरिक्त शुल्क आणि उपचाराच्या बिलातील अस्पष्टता याबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. रुग्णाला आपल्या उपचाराबाबत माहिती मिळण्याचा अधिकार आहे. कोणती तपासणी आवश्यक आहे, कोणती ऐच्छिक आहे, कोणत्या औषधाची किंमत किती आहे आणि प्रत्येक वैद्यकीय सेवेचे शुल्क किती आहे, हे त्याला समजले पाहिजे. मात्र वैद्यकीय क्षेत्रातील तांत्रिक भाषा आणि गुंतागुंतीच्या बिलिंग व्यवस्थेमुळे सामान्य रुग्ण अनेकदा असहाय होतो. आजारी व्यक्ती आणि चिंताग्रस्त नातेवाईक डॉक्टरांच्या निर्णयावर विश्वास ठेवतात. या विश्वासाचा गैरफायदा घेतला जात असेल, तर तो केवळ व्यावसायिक व्यवहार राहत नाही; तो रुग्णाच्या असहायतेचे आर्थिक शोषण ठरतो. याहून गंभीर प्रश्न म्हणजे आरोग्य विमा असूनही रुग्णांच्या खिशातून होणारा खर्च. विमा क्षेत्राचा विस्तार झाला, विम्याच्या योजना वाढल्या, तरी प्रत्यक्ष उपचाराच्या वेळी विम्याच्या अटी, अपवाद, सहभरणा, विमा मर्यादा आणि नाकारले जाणारे दावे यामुळे कुटुंबाला मोठी रक्कम स्वतःच्या खिशातून भरावी लागू शकते. त्यामुळे केवळ 'विमा कवच किती लोकांकडे आहे?' हा प्रश्न पुरेसा नाही. 'विमा असूनही उपचारासाठी कुटुंबाला किती पैसे स्वतःच्या खिशातून द्यावे लागतात?' हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. सरकारने या समस्येकडे केवळ विम्याचा विस्तार म्हणून पाहण्याऐवजी सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेची क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने पाहिले पाहिजे. सरकारी रुग्णालयांमध्ये पुरेशा खाटा, डॉक्टर, परिचारिका, औषधे, निदान सुविधा आणि अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर खासगी रुग्णालयांच्या शुल्कात पारदर्शकता आणणे, अनावश्यक तपासण्यांवर नियंत्रण ठेवणे आणि रुग्णाला स्पष्ट व समजण्यासारखे बील देणे बंधनकारक केले पाहिजे. कारण आरोग्यसेवा ही चैनीची वस्तू नाही. आजारपण कोणाची आर्थिक स्थिती पाहून येत नाही. एखाद्या कुटुंबातील कमावत्या व्यक्तीला गंभीर आजार झाला तर काही दिवसांत वर्षानुवर्षांची बचत संपुष्टात येऊ शकते. उपचाराचा खर्च भागवण्यासाठी कर्ज घ्यावे लागू शकते, मालमत्ता विकावी लागू शकते आणि मुलांच्या शिक्षणासारख्या मूलभूत गरजांवरही परिणाम होऊ शकतो. म्हणूनच आरोग्यव्यवस्थेच्या यशाचे मोजमाप केवळ किती रुग्णांवर उपचार झाले यावर न करता, किती नागरिकांना उपचार घेतल्यानंतरही आर्थिकदृष्ट्या सुरक्षित ठेवता आले, यावर झाले पाहिजे. उपचाराने रुग्णाचे प्राण वाचले, पण कुटुंब आर्थिकदृष्ट्या उद्ध्वस्त झाले, तर त्या आरोग्यव्यवस्थेच्या यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित होते. भारताला खऱ्या अर्थाने आरोग्यदायी राष्ट्र बनवायचे असेल, तर रुग्णाला दोन पर्यायांपैकी एक निवडण्यास भाग पाडता कामा नये. जसे स्वस्त, पण अपुऱ्या सुविधा किंवा महागडी तत्काळ सेवा. दर्जेदार, वेळेवर आणि परवडणारी आरोग्यसेवा हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार ठरवण्याची वेळ आता आली आहे.

# ज्येष्ठांचा आनंद तरुणाईसाठी प्रेरणादायी ठरावा



सकाळी चालायला गेल्यावर अनेक ज्येष्ठ नागरिकांची भेट होते. एकेकांची स्वभाव वैशिष्टे, मानसिकता किंवा त्यांच्या वाट्याला आलेली प्रश्नांची गुंतागुंत पाहिली की आपल्या विचाराला चालना मिळते. त्यातील काहींनी आपल्या नकारात्मक विचाराने आपले दैनंदिन प्रश्न वाढविलेले असतात. तर काही आपल्याभोवती निर्माण झालेल्या प्रश्नांची गुंतागुंत सकारात्मक विचाराने सोडविण्यासाठी सक्रीय असतात. शक्यतोवर कशाचाही मोह न ठेवता कुटुंब, आप्तेष्ठ व स्नेहीजनांना आनंदी ठेवणारे तेच खरे ज्येष्ठ, पण ज्या व्यक्तीमत्वात सर्व गोष्टी याऊलट आढळतात ते खरे वृद्ध.वयाने, शरीराने, मनाने आणि विचाराने सुद्धा.

एके दिवशी सकाळी चालता चालता सदाअण्णा आजोबांना सहज म्हणालो, आजोबा आता एकट्याने प्रवास करणे टाळा. त्यावर तात्काळ उत्तर मिळाले, आता जगून तरी काय करायचं? अन् आता मौतीलं, सावडायलं, तेरवीलं जायचं असलं तं नंबर आमचाच, कारणं आमचं तिकीट नाही लागतं. अहो मास्तर, आमचं मरण पण बिनातिकीट झालं पाहिजे, असं वाटते या नालायक औलादीलं. आमची सगळी कमाई मात्र आलगद याह्याच्या तोंडात येवून पडली पाहिजे. थोडं अनपेक्षित उत्तर मिळाल्याने मी जरा सावध झालो. आता आपलं आग्रही मत मांडण्यापेक्षा त्यांना काय वाटते? ते जाणून घेवू या, असा विचार करुन मी पुढे त्यांना म्हणालो, आजोबा प्रवास करतांना जोडीदार सोबत घेवून फिरण्याविषयी तुमचं मत काय? त्यावर उत्तर मिळाले, अहो मास्तर घरी असल्यावर बाई डोस्क्यालं कमी किकरं लावती का? पारं भूगा करुन टाकती बघा डोस्क्याचा. आता तं मले वाटते की डोस्क्यातं मेंदू नावाची काही गोष्ट शिल्लक राह्यली का नाही? काही पत्ताच लागतं नाही बघा. अहो बाहीरं आल्यावर तुमच्यासारखे काही माणसं भेटतातं तेवढंच आमचं आनंदी जग. एकदा घरी गेल्यावर जेवढी दातखिळी बसवून घेतली तेवढं चांगलं. एकदा मी घरात गेल्यावर आजेबात बोलायचं नाही असं ठरवून उगं गप्पगार बसलो. कोण काय बोलतंय लक्षच द्यायचं नाही म्हणलं. तं घरवाली म्हणती, म्हथारं बहीरं झालं वाटते. लगेच सून म्हणती, मुकं बी झालं वाटते अन् हे ऐकून आमच्या वंशाचा दिवा दात काढतोय, आता हे ऐकून घरातली सगळी माकडाची पीलं गप्प बसणार का? असं आपल्या जीवाचं हासं झाल्यावर कोणाच्या सोबत प्रवास करण्यात तरी काय मजा हे, आता तुम्हीच सांगा. मी थोडा विचार करतच पुढचा प्रश्न विचारला, तुम्ही घरुन निघाल्यावर हाय वे ओलांडून येता.तुम्हाला भीती वाटत नाही का? यावर त्यांचं उत्तर, आता आमच्यावाचून कोणाचं काही आडतं का? आम्ही आज मेलो काय, अन् उद्या मेलो काय? फक्त जातांना पट्कन जागच्या जागी जीव गेला पाहिजे. फालतूचा त्रास आपल्याला नको अन् आपल्यामुळं कोणालं नको. सदाण्णा बहुतांशी घरातीलं कटूसत्य फार स्पष्ट शब्दात सांगून गेले. माझ्या डोक्यातही विचारांचं काहूर सुरु झालं.

उतार वयातही आपलं शरीर स्वास्थ्य खूप उत्तम राहावे यासाठी काही ज्येष्ठ नागरीक आग्रही असतात, त्यामुळे अतिव्यायाम अति चालणे हा प्रयोग करुन उतार वयात तरुण होण्याचे अघोरी प्रकार करतानाही दिसतात. अचाट साहस दाखविण्याचे हास्यास्पद प्रयोग करून नेमके ते काय साध्य करतात? या प्रश्नाची उकल ब्रह्मदेवासही होऊ नये, याची काळजी घेणारे ज्येष्ठ काही लोकांसाठी श्रेष्ठ असू शकतात. पण आपले वर्तन हे सर्वमान्य झाले नाही तरी ते सर्वसमावेशक करण्याचा किमान प्रयत्न करायला काही हरकत नसावी. भरपूर वाचन किंवा प्रसार माध्यमांचा उपयोग करुन नव्या पिढीसमोर किंवा पुढच्या पिढीसाठी काही विचारधन ठेवणारे ज्येष्ठ आपल्या कार्यावर निष्ठा ठेवून कार्यरत राहतात. आपल्या कार्याचा विनोद करणाऱ्या चिल्लर नाण्याकडे फारसे लक्ष देण्याची त्यांना गरज वाटत नाही. ते कितीही खनखन वाजत असले तरी त्याला आता लवकर भिकारीही घेत नाही. हे ओळखून असणारे ज्येष्ठ समाज व देशासाठी श्रेष्ठ असतात. आपले आरोग्य सांभाळतांना आरोग्य संवर्धनाचा मार्ग नैसर्गिक असावा. त्यामुळे तो आपल्यासाठी हिताचा असेलच, पण पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरेल यासाठी ते सदैव जागरूक असतात. सेवानिवृत्तीनंतर त्यांना आपली संपत्ती वाढवून हावरटपणाचा अतिरेक करण्याची गरज वाटत नाही. त्याबाबत 'पांढरे केस आणि हिरवी मने' ऐवजी हिरवट मनाचे ज्येष्ठ फक्त निसर्ग नियमानुसार वयाने मोठी असतात. मी किती माया जमा केली म्हणून माझे कौतुक करा. अशी त्यांची प्रवृती असते. त्यामुळे भाडोत्री भाट लावून ते स्वतःवर दिवे ओवाळून घेतात आणि त्या झगमगाटात आपला चेहरा किती लख्ख चमकतो, हे सिद्ध करण्यासाठी त्यांचे कौतुक सोहळे सुरु असतात. भूतकाळ विसरुन भविष्याची फार चिंता न करणारे ज्येष्ठ नागरिक सदासर्वदा कोळसा उगाळत नाहीत आणि कसं होईलं काय होईलं या मंत्राचा जप करत नाहीत. पचेल तेवढच खातात. भूक नसतांना कुस्करू कुस्करू हाणा. अशा वर्तनाचे लग्नातील वऱ्हाडी होतं नाहीत. शुगर लेव्हल चारशे झाल्यावर सुद्धा स्पर्धा लावून गोड पदार्थ खाणारे ज्येष्ठ, साखर सम्राट आपला कारखाना कधीच तोट्यात येवू देत नाहीत. त्यांना आघाडीच्या शुगर लॉबी संचालक मंडळात घेऊन 'कारखाना नफ्यात संचालक स्वर्गात' हा स्लोगन देउन भ्रष्टाचारी संचालकांना बाहेर काढलेच पाहिजे. हे स्वर्गात असले तरी कारखाना नफ्यात राहील याची खात्री ते देवू शकतात. ज्येष्ठ नागरिकांनी बाथरूम व स्वच्छतागृहात सावकाश वावरले पाहिजे. आत गेल्यावर पैशाचा अतिविचार करणाऱ्या व्यवहारदक्ष अनेक ज्येष्ठ नागरिकांना दरवाजा तोडूनच बाहेर काढावे लागले. या वस्तुस्थितीचा विसर पडू देवू नये. धूम्रकांडी, मद्यदांडी आणि नॉनव्हेज हंडी सोबत वाहवत जाणे टाळावे. याबाबतीत तळीराम आदर्श ठेवून तळीराम गट निर्माण करुन आपल्या कर्तृत्वाची व आपण भोगलेल्या हालापेष्ठाची दर्दभरी कहानी कोणालाही ऐकवण्यात धन्यता मानू नये. वारंवार तीच कॅसेट ऐकवल्यास थोड्याच कालावधीत ते ऐकण्यासाठी भाड्याने माणसे मिळणार नाहीत. मद्यधुंद झालेल्या ज्येष्ठांना आपला भूतकाळ खूप आठवतो .लख्ख प्रकाश झाल्यावर जसे सर्व स्पष्ट दिसते तसे मद्यधुंद झाल्यावर विस्मरणाची शिकार झालेल्या अनेक घटना त्यांना आठवतात आणि मग, अभी तो मैं जवान हूं ही त्यांची अवस्था होते. असे कृत्रिम प्रयोग टाळणे आपल्या स्वास्थ्यासाठी लाभदायक असते.

निवृत्तीनंतर आपल्याला प्रवासाची आवश्यक्ता वाटत असल्यास आपला जोश आणि होश लक्षात घेवून प्रवास करावा. तो प्रवास आणि त्यातील आपली आवड याविषयीच्या कल्पना स्पष्ट असाव्या. तो टूर कंपन्यांच्या फायद्यासाठी करुन आपला वेळ, पैसा, धावपळ आणि जीव धोक्यात घालणे म्हणजे आपली विवेक बुद्धी गहाण ठेवणे होय. अतिभावनाप्रधान होवून कुणावर तरी अतिविश्वास टाकणे ही आपल्या फसवणुकीसाठी समोरच्या व्यक्तीला निर्माण करुन दिलेली संधी होवू शकते. सकारात्मक विचारांची साथ शेवटच्या क्षणापर्यंत सत्कार्याचा मार्ग दाखविते. त्यामुळे 'जाऊ सुखे नरकात' असे म्हणण्याची वेळ येत नाही. नव्या पिढीला सतत सल्ला देवून 'फुकट सल्ला केंद्र' (फुसकें) होऊन टवाळीचा विषय होण्यात काय हशील आहे? हा विचार करण्याची क्षमता शेवटच्या क्षणापर्यंत कायम राहावी यासाठी मेंदू नावाच्या अवयवाची तेवढी मशागत असावी. त्याबरोबर तो आपल्या डोक्यात त्याच्या ठिकाणी राहून त्याला कार्यरत ठेवण्याचे स्मरण ठेवल्यास मरण पुढे ढकलून जगणे सुसह्य होईल. आपल्याला रिकामा वेळ आहे म्हणजे तो इतरांनाही आहे असा आपल्या सोयीचा समज करुन आपले रिकामटेकडे उद्योग वाढविण्याची रिकामचोट बुद्धी आपणास न मिळो अशी प्रार्थना त्या विधात्याकडे करण्यासाठी दररोज थोडे तरी एकाग्र झाले पाहिजे. काहीही आवश्यक्ता नसतांना आणि आयुष्य किती शिल्लक राहिले? हे जरी माहीत नसले तरी लागले नेत्र पैलतीरी एवढे कळूनही पैशाचा पाठलाग जमिनीला पाठ लागेपर्यंत करत राहणे, या हावरटपणाला वेळीच पूर्णविराम देता आला तरच ज्येष्ठत्वासोबत श्रेष्ठत्व प्राप्त झाले असे म्हणावे लागेल. दुपारी मनसोक्त झोप घेवून रात्रीचे जागरण करत इतरांच्या झोपेत अडथळे आणून मी रात्री घरातच गस्त घालून घराची किती काळजी घेतो, असे आपल्या वर्तनाचे उदात्तीकरण करणे याला ग्रेट कसे म्हणावे? आपले छंद अवश्य जपा. त्यासाठी थोडे एकांतप्रिय व्हा पण त्यासाठी इतरांच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याची गरज नाही. ज्येष्ठ नागरिक संघाचे सभासद अवश्य व्हा.तिथे वादावादी करुन मला किती कळते व इतर सर्व कसे बालबुद्धीचे आहेत. हे सिद्ध करण्याचे अचाट प्रयोग टाळा. जेष्ठांनी बनवाबनवी करणे सर्वअमान्य असते हे विसरु नका.आपल्या घरासमोर फुलांचे एकही झाड न लावता, भल्या पहाटे उठून इतरांची फुले चोरण्यात धन्यता मानू नका.देवासाठी चोरलेली फुले निषिद्ध आहेत.मनोभावे पूजा किंवा सदाचाराच्या पालखीला फुलांची आवश्यकता नाही. राजकारणाची निरर्थक चर्चा करुन आपल्या व इतरांच्या डोक्याला शिण आणू नका.मतभिन्नता मान्य करुन व्यक्तीस्वातंत्र्य मान्य करा. 'देखोना मेरी मुर्गी एक टांगपे कबसे खडी' ह्या हेकडपणाचा व्यर्थ अभिमान हे शहाणपणाचे लक्षण नव्हे. आपल्या आजाराचे सतत कौतुक करण्यापेक्षा डॉक्टरजवळच सत्यकथन करा. जोडीदारासोबत तुटेपर्यंत ताणत बसण्यापेक्षा यशस्वी माघार घेण्यातीलं शहाणपणा लक्षात घ्या. साठा गेला तरी ताठा कायम ठेवण्यात काहीच अर्थ नसतो, हे सुरुवातीला लक्षात आले नसले तरी शेवटी शेवटी यायला काही हरकत नसावी. प्रवचन, किर्तन, सत्संग, सभा, संमेलने, सांस्कृतिक उपक्रमात सहभागी अवश्य व्हा पण आंधळे अनुयायी होण्याचे मात्र टाळले पाहिजे.अति गर्दीत प्रवेश करुन अध्यात्माचे ढोंग करणाऱ्या पाखंड्याचे दर्शन घेण्यासाठी पंगू होणे किंवा प्राण गमावून आपली भक्ती सिद्ध करण्याची गरज नाही. आपल्या देहाला एवढे स्वस्त का आणि कशासाठी करायचे? हा प्रश्न असे निर्णय घेण्यापूर्वी स्वतःला विचारता आले पाहिजे. याशिवाय प्रत्येक वेळी काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या सहा शत्रूंना दूर ठेवून निर्णय घेतला तर सदाअण्णावर जो पश्चात्ताप करण्याची वेळ आली ती आपल्यावर येणार नाही.आपल्या वाढत्या वयात मी वृद्ध नसून ज्येष्ठ आहे. हे आपल्या वर्तनातून सिद्ध होते. बरेचदा आपण स्थितप्रज्ञ असणे हे सुद्धा ज्येष्ठत्वाचेच लक्षण आहे.

**–प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# लेखणीतून समाजप्रबोधन



समाजात वावरत असताना अनेक वेळा आपल्याला काही गोष्टींचा सामना करावा लागतो. आपल्याला दृढतेने असे वाटू लागते की, सर्व गोष्टींमध्ये बदल घडणे अत्यंत गरजेचे आहे, परंतु सर्वसाधारण माणूस अशा सुधारणासाठी कधीच गंभीर होताना दिसत नाही जणू काही सर्व चुकीच्या व्यवस्था त्याने मान्य केल्या आहे की काय असे वाटू लागते. एक व्यवस्था तयार होताना त्यामध्ये वरच्या घटकापासून सर्वात खालच्या घटकापर्यंत सर्वांना आपापली जबाबदारी दिलेली असते व अशा जबाबदाऱ्यांना पूर्णत्व देण्याची प्रकिया पूर्व नियोजित केलेली असते. जेव्हा एखाद्या पातळीवर ती जबाबदारी पार पडताना कुचराई केली जाते तेव्हा संपूर्ण व्यवस्था कोलमंडून जाते व याचा दुष्परिणाम प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या सर्व समाजावर पडत असतो.

एकंदरीत अशा कोणत्या व्यवस्था व त्यांच्याशी संलग्न असणाऱ्या जबाबदाऱ्या असतील याचा विचार केला असता एक नागरिक म्हणून आपण स्वतः, समाज व्यवस्था, अर्थव्यवस्था, राजकीय व्यवस्था आणि न्यायव्यवस्था या सर्व घटकांचा समावेश होतो. एक सुजाण नागरिक म्हणून आपण या देशाविषयी कोणत्या पातळीवर जाऊन विचार करतो हे पण तेवढेच महत्त्वाचे आहे. मी जर या समाजामध्ये राहतो तर या समाजाबद्दल माझी पण काही बांधिलकी आहे हा विचार मनामध्ये कायम असला पाहिजे. मला समाजाकडून काही अपेक्षा असतील तर मी पण समाजाचे काही देणे लागतो हा पण विचार केला पाहिजे. अर्थव्यवस्थेकडून मी माझ्याबद्दल काही अपेक्षा ठेवत असेल तर या देशाच्या विकासासाठी मी किती सहकार्य करतो याचा पण विचार केला पाहिजे. राजकारणाबद्दल सहसा कोणाचेही संतोषजनक मत नाही. देश योग्यरीत्या चालला पाहिजे तर व्यवस्थापन तेवढेच मजबूत हवे. नागरिकांना ही व्यवस्था मजबूत करण्यासाठी मतदानाचा हक्क दिलेला आहे. त्या हक्कामुळे तो मतदान करतो तरीसुद्धा त्याच्या मनात संकुचितता काय यावी. प्रत्येकजण उदासीन असलेला पाहायला मिळतो. न्यायव्यवस्थेबद्दल अजून तरी कुणाचे दुमत नाही. प्रत्येक नागरिक स्वतःसाठी या सर्व घटकांकडून योग्य ती अपेक्षा ठेवून आपले जीवन जगत असतो. यापैकी कोणताही घटक आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडत नसेल तर ते समाजापुढे आणण्याचे काम लेखक, कवी, साहित्यिक, शाहीर, समाज सुधारक आणि पत्रकार हे प्रखरतेने आपापले साहित्य प्रकार किंवा त्यांच्या क्षेत्रामधून व्यवस्थेतील चुका समाजापुढे आणण्याचे काम करतात. साहित्य असे माध्यम आहे ज्याद्वारे अचूकतेने आजपर्यंत हे कार्य होत आहे.

एक लेखक अथवा कवी कधीच प्रसिद्धी हा उद्देश समोर ठेवून लेखनी चालवत नाही तर त्यामागे समाज सुधारणा किंवा चुकीच्या बाबींना वेळीच आरसा दाखवणे हा मूळ उद्देश असतो. जेव्हा साहित्यिक आपल्या साहित्याला जन्म देतो तेव्हा प्रामुख्याने काही गोष्टींवर प्रकाश टाकण्याचे काम करतो. आपण २१ व्या शतकात आहोत हे आपण अभिमानाने सांगतो आणि स्वतःला सुशिक्षित आणि सामंजस असल्याचे दाखवतो, परंतु दुसरीकडे प्रसार माध्यमांमध्ये ज्या घटना ऐकायला किंवा पाहायला मिळतात त्यामध्ये स्त्रीभ्रूण हत्या, शेतकरी आत्महत्या, निर्बल समाज घटकावर होणारा अन्याय व बलात्कार यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे पाहायला मिळते. एक लेखक किंवा कवी ह्या घटनांना समोर ठेवून पीडित घटकांची व्यथा व त्यांच्या आक्रोषातून भविष्यात होणारे दुष्परिणाम आपल्या लिखाणातून समाजासमोर आणण्याचे काम करतो. हे करत असताना पावलोपावली त्याचे अनेक विरोधकही बनत जातात. याचा विचार करता तो केवळ प्रसिद्धीसाठी लिहीत नाही हे स्पष्ट होते. लिखाणा मागचा हेतू केवळ समाज प्रबोधन आणि मरगळ आलेल्या समाजात नवचैतन्य भरण्याची शुद्ध भावना असते. समाजातील अनेक वाईट चालीरीती रूढी-परंपरा यावर प्रखरतेने टीका करत योग्य ते बदल घडवण्याचे कार्य तो निरंतर करत राहतो. समाजातील जाणते किंवा अजाणते दोन्हीही घटक याद्वारे आपले अधिकार, हक्क व जबाबदाऱ्या समजून घेऊन त्याप्रमाणे जीवनात बदल घडवू शकतात. गरजेचे आहे तिथपर्यंत आपला आवाज पोहोचवू शकतात. व्यवस्थेतील उणिवा भरून काढण्यासाठी योग्य ती पावले उचलू शकतात.

दैनंदिन जीवन जगत असताना सामाजिक अथवा राजकीय क्षेत्रात घडणाऱ्या घटने बदल सकारात्मक व नकारात्मक जी काही विचारधारा निर्माण होत असते त्यांना शब्दात मांडून तो व्यक्त होत असतो मग त्याचे प्रकार अनेक असतील प्रामुख्याने कविता किंवा लेखन हा प्रकार आहे. लिखाणाच्या माध्यमातून चुकीच्या घटकांची कानपिळणी करण्याचे काम साहित्यिक करत असतो. समाजात घडणाऱ्या अहितकारी बाबीं विरोधात जेंव्हा लेखन केले जाते तेव्हा नक्कीच समाजापर्यंत सकारात्मक विचार पोहोचले जातात व त्याचा परिणाम म्हणून एक समृद्ध व सक्षम समाज निर्माण होताना पाहता येतो. समाज म्हणजे नेमके काय यावर थोडं बोलायचं झालं तर अनेक संबंधाचे जाळे म्हणजे समाज होय. माणसाचा जन्म होतो तेव्हापासून त्याला समाजाची गरज पडते आणि स्वतःभोवती तो असेच जाळे निर्माण करत चालतो.या समाजात जेंव्हा तो वावरू लागतो तेव्हा त्याला अनेक गोष्टींचा उलगडा होत जातो.त्याची विचारधारा आणि मानसिक अवस्था त्याद्वारे बनत जाते व तसे जीवन घडत जाते.जीवनात येणाऱ्या अडचणीवर मात करण्यासाठी त्याची विचारसरणीच कार्य करत असते. अशाच मौलिक विचारांचा आधार घेत साहित्यिक घडत असतो आणि समाजपयोगी विचारधारेला शब्दरूप देऊन साहित्य निर्मिती करत असतो.

एक लेखक लिहिताना सर्व घटकांच्या चुका समोर ठेवून त्याबद्दल निर्भिड होऊन लिखाण करत राहतो. आपण पाहतो अनेक वेळा साहित्यकार किंवा पत्रकार यांच्यावर टीका केली जाते व त्यांना नाहक त्रास दिला जातो तरीही तो लिहिणे थांबवत नाही. साहित्य म्हणजे काट्याने भरलेला रस्ता आहे असेच म्हणता येईल.या देशात अनेक साहित्यिक होऊन गेले ज्यांनी या समाजाला खूप मोठा साहित्य खजिना दिला आहे.साहित्य हे समाजात असणाऱ्या दरीला संपवण्यामध्ये अनमोल भूमिका बजावतात.साहित्याची जोड असल्याशिवाय कुठलीही व्यवस्था ध्येयापर्यंत पोहोचू शकत नाही.

**–पवन कुसुंदल**
नंदीग्राम सोसायटी, नांदेड
संपर्क: ९०७५५९५६९५

# फुटबॉलच्या आकाशातील तेजस्वी तारा; लिओनेल मेस्सी

जगभरातील फुटबॉलप्रेमींसाठी ३१ ऑगस्ट २०२६ हा दिवस भावूक करणारा ठरला. अर्जेटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी याने तब्बल दोन दशकांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीनंतर राष्ट्रीय संघातून निवृत्ती जाहीर केली. मेस्सीने संपूर्ण फुटबॉलला अलविदा केलेला नसून, त्याचा हा निर्णय केवळ अर्जेंटिनाच्या राष्ट्रीय संघापुरता आहे. तो इंटर मियामीकडून क्लब फुटबॉलमध्ये खेळत आहे.



रोझारियोच्या मातीतून फुटबॉलच्या विश्वात आलेल्या मेस्सीने आपल्या अद्भुत कौशल्याने, अचूक पासिंगने, वेगवान ड्रिब्लिंगने आणि गोल करण्याच्या विलक्षण क्षमतेने जगाला अक्षरशः मंत्रमुग्ध केले. २००५ मध्ये अर्जेंटिनाकडून आंतरराष्ट्रीय पदार्पण केल्यानंतर त्याने २०७ सामने खेळत १२५ गोल केले. तो अर्जेंटिनाचा सर्वाधिक सामने खेळणारा आणि सर्वाधिक गोल करणारा खेळाडू ठरला.

मेस्सीच्या कारकिर्दीत यशाबरोबरच अपयशाचीही अनेक पाने होती. २०१४ च्या विश्वचषकातील अंतिम सामन्यातील पराभव आणि कोपा अमेरिका स्पर्धेतील अपयशानंतर त्याच्यावर मोठी टीका झाली. मात्र त्याने हार मानली नाही. २०२१ मध्ये कोपा अमेरिका, २०२२ मध्ये कतार विश्वचषक आणि २०२४ मध्ये पुन्हा कोपा अमेरिका जिंकून त्याने टीकाकारांना आपल्या कामगिरीने उत्तर दिले. २०२२ च्या विश्वचषक विजयाने तर त्याच्या कारकिर्दीला सुवर्णमुकुट मिळाला.

२०२६ च्या विश्वचषकातही मेस्सीने अर्जेटिनाला अंतिम फेरीपर्यंत नेले. मात्र स्पेनविरुद्धच्या अंतिम सामन्यात अर्जेटिनाला पराभव पत्करावा लागला. त्यानंतर मेस्सीने राष्ट्रीय संघातून बाजूला होण्याचा निर्णय घेतला. वयाची ३९ वर्षे, प्रदीर्घ कारकीर्द आणि नव्या पिढीला संधी देण्याची वेळ आली आहे, या जाणिवेतून त्याने हा निर्णय घेतला.

मेस्सीचे महत्त्व केवळ त्याने केलेल्या गोलांमध्ये किंवा जिंकलेल्या पदकांमध्ये नाही. संघर्षातून यश मिळवता येते, टीकेला संयमाने उत्तर देता येते आणि अपयशानंतर पुन्हा उभे राहता येते, हा संदेश त्याने जगातील लाखो तरुणांना दिला. आठ वेळा बॅलन डी'ऑर पुरस्कार मिळवणाऱ्या मेस्सीने फुटबॉलच्या इतिहासात स्वतःचे असे स्थान निर्माण केले आहे, जे पुढील अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी राहील.

मेस्सीचा अर्जेंटिनाच्या जर्सीतील प्रवास आता संपला असला तरी त्याच्या पायातील जादू आणि मैदानावरील आठवणी कायम राहतील. अर्जेटिनासाठी त्याने दिलेले योगदान, देशाला मिळवून दिलेली विश्वचषकाची ऐतिहासिक भेट आणि फुटबॉलप्रेमींच्या मनात निर्माण केलेली असंख्य अविस्मरणीय क्षणे यामुळे मेस्सी हा केवळ एक महान खेळाडू नव्हे, तर फुटबॉलच्या इतिहासातील एक अमिट अध्याय म्हणून सदैव स्मरणात राहील.

मेस्सी राष्ट्रीय संघातून निवृत्त झाला आहे; पण त्याची जादू अजून संपलेली नाही. मैदानावरील त्याच्या पावलांचे ठसे पुसणे फुटबॉलच्या इतिहासालाही शक्य होणार नाही.

**–श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# एकही पात्र मतदार वंचित राहू नये यासाठी विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेची जनजागृती करा -जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

नांदेड (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील एकही पात्र मतदार मतदार यादीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व राजकीय पक्षांनी तसेच नागरिकांनी विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेची व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.



विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ ऑक्टोबर २०२६ या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी सर्व तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये तसेच मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आली असून, प्रारूप मतदार यादी तसेच अनुपस्थित, स्थलांतरित, मयत व दुबार मतदारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परपवशव.पळल.ळप या जिल्हा संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आली आहे.

सर्व मतदारांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव, वय, पत्ता व इतर तपशील अचूक असल्याची खात्री करावी. मतदारांना ींशिीं. शलळ.सीं.ळप किंवा लशे.ारहरीरीहीीर.सीं. ळप या संकेतस्थळावर तसेच वोटर हेल्पलाईन ॲपद्वारे नाव तपासता येईल. याशिवाय १९५० या वोटर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून अथवा एसएमएसद्वारेही माहिती घेता येणार आहे. प्रारूप मतदार यादीबाबत ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार असून त्यावर सुनावणी व निपटारा २९ ऑक्टोबर २०२६ पर्यंत करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध होणार आहे.

१ ऑक्टोबर २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरिकांनी नवमतदार म्हणून नोंदणीसाठी नमुना ६ अर्ज घोषणापत्र व आवश्यक कागदपत्रांसह सादर करावा. मतदार यादीतील नावाला हरकत अथवा नाव वगळण्यासाठी नमुना ७, तर नाव, वय, पत्ता आदी तपशीलात दुरुस्ती, अपंगत्वाचे चिन्हांकन किंवा मतदारसंघातील पत्ता स्थलांतरासाठी नमुना ८ अर्जाचा वापर करावा. परदेशी भारतीय मतदारांच्या नोंदणीसाठी नमुना ६-अ अर्जाचा वापर करता येईल. पात्र मतदाराचे नाव वगळले असल्यास किंवा मतदार यादीतील तपशीलात त्रुटी असल्यास संबंधित बीएलओ, मतदार नोंदणी अधिकारी अथवा उपलब्ध ऑनलाईन माध्यमातून ३० सप्टेंबर २०२६ पूर्वी दावे व हरकती नोंदवाव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

नाव, वय अथवा इतर तपशीलांतील विसंगती किंवा अनमॅपिंगबाबत मतदार नोंदणी अधिकाऱ्यांकडून नोटीस प्राप्त झालेल्या मतदारांनी सुनावणीच्या वेळी जन्मतारीख व जन्मस्थळ सिद्ध करणारी आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत. जन्म प्रमाणपत्र, पारपत्र, मॅट्रिक्युलेशन प्रमाणपत्र, कायमस्वरूपी रहिवासी प्रमाणपत्र, वनहक्क प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, शासकीय अथवा सार्वजनिक उपक्रमांचे ओळखपत्र, निवृत्तीवेतन आदेश, कुटुंब नोंदवही, जमीन अथवा घर वाटप प्रमाणपत्र आदी कागदपत्रे आयोगाच्या निर्देशानुसार ग्राह्य धरली जातील. मतदार यादीच्या अनुषंगाने मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडे, तर जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अपील करता येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी यावेळी दिली.

# वसंतराव नाईक महाविद्यालयात मेजर ध्यानचंद जयंती आणि राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांची जयंती आणि राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो.डॉ. शेखर घुंगरवार तर प्रो.डॉ. रेणुका मोरे, डॉ. साहेबराव मोरे, आर. डी. राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन आणि राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त क्रीडा दिन विशेषांकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. राष्ट्रीय, राज्यस्तरीय आणि विद्यापीठ स्तरावरील विविध क्रीडा स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार म्हणाले की, मेजर ध्यानचंद यांच्या क्रीडा क्षेत्रातील गगनभरारीमुळे भारताची मान जगात उंचावली. आज मेजर ध्यानचंद यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी कटिबद्ध होण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. साहेबराव मोरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, सूत्रसंचालन डॉ. महेश जाधव यांनी तर डॉ. राहुल सरोदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी प्रो. डॉ. नागेश कांबळे, डॉ. शेषराव शेटे, डॉ. आर. एम. कागणे, डॉ. सुनीता गरुड, डॉ. गणेश लिंगमपल्ले, डॉ. साहेबराव शिंदे, डॉ. विजय कुमार मोरे, डॉ. संजय गिरे, प्रा. कविता हंबर्डे, प्रा. शशिकांत हटकर, प्रा. बुशरा शेख, प्रा. कपिल हिंगोले, प्रा. सुरेश तिवारी, डॉ. शोभा वाळुक्कर, प्रा. पंढरीनाथ गड्डपवार, प्रा. राहुल पडोळे, प्रा. प्रबुध्द चित्ते, प्रा. विभुते, प्रा. अश्विनी जगताप, प्रा. डोंगरे, प्रा. आडे, डॉ. रत्नपारखे, डॉ. सूर्यवंशी प्रा.जुनैद मिर्झा यांच्यासह कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी यांची उपस्थिती होती. राष्ट्रगीताने प्रस्तुत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# गणितीयशास्त्रे संकुलाच्या २६ माजी विद्यार्थ्यांची शिक्षकपदी निवड

## शिक्षण क्षेत्रात बजावणार महत्त्वपूर्ण भूमिका

**नांदेड (प्रतिनिधी)**- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या गणितीयशास्त्रे संकुलातील २६ माजी विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करीत पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकपदी निवड मिळविली आहे. या यशामुळे संकुलाच्या शैक्षणिक गुणवत्तेची आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमाची प्रचिती पुन्हा एकदा आली असून, हे विद्यार्थी भविष्यात शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहेत.

पवित्र पोर्टलद्वारे शिक्षकपदी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नियुक्ती विविध जिल्हा परिषद, आदिवासी विभाग तसेच शैक्षणिक संस्थांमध्ये झाली आहे. त्यामध्ये रुपाली शिंदे जि.प. बुलढाणा, संतोष पांग्रेकर जि.प. वाशिम, अजय मुलगीर जि.प. नाशिक, विठ्ठल दांडे जि.प. वाशिम, सूर्यकांत केंद्रे जि.प. नाशिक, पांडुरंग काकडे जि.प. वाशिम, कोमल मरकड जि.प. पालघर, समाधान साबळे आदिवासी विभाग, ठाणे, पल्लवी पाटील आदिवासी विभाग, ठाणे, ज्ञानेश्वर धानवे जि.प. वाशिम, पूजा रोकडे जि.प. अहिल्यानगर, अक्षय सावंत जि. प. सोलापूर, समृद्धी शिंगटे जि. प. सोलापूर, रोहिणी दोईफोडे जि.प. सातारा, पांडुरंग देशमुखे आदिवासी विभाग, नाशिक, रामानंद काळे जि. प. अमरावती, प्रणिता चालवड जि. प. सोलापूर, भाग्यश्री चट्टे आदिवासी विभाग, ठाणे, स्वाती हंकारे जि.प. पुणे, राखी परवे आदिवासी विभाग, नागपूर, दीप्ती वारे जि.प. पुणे, शिवकन्या शिंदे जि.प. पुणे, निकिता पारे जि. प. पालघर, वर्षा राठोड इंदिरा शिक्षण संस्था, मंठा, शैलजा गोसावी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर आणि स्वाती राजे जि.प. सोलापूर यांचा समावेश आहे.



या विद्यार्थ्यांनी गणितीयशास्त्रे संकुलातून प्राप्त केलेल्या ज्ञानाचा व कौशल्याचा उपयोग करून आता शिक्षक म्हणून भावी पिढी घडविण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी स्वीकारली आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याबरोबरच त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि ज्ञानाची आवड निर्माण करण्यासाठी हे शिक्षक मोलाचे योगदान देतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन तसेच कुलसचिव डॉ. डी. डी. पवार यांनी सर्व यशस्वी माजी व विद्यमान विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या भावी अध्यापन कारकिर्दीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

गणितीयशास्त्रे संकुल परिवाराच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या उज्ज्वल व प्रेरणादायी अध्यापन कारकिर्दीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# 'यशवंत' मध्ये टीबीमुक्त भारत अभियान जनजागृती

**नांदेड (प्रतिनिधी)** -यशवंत महाविद्यालयात नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने 'टीबीमुक्त भारत अभियान' अंतर्गत क्षयरोगाबाबत जनजागृती कार्यक्रम नुकताच पार पडला.

या अभियानांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी व एनसीसी कॅडेट्समध्ये क्षयरोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, तपासणी व उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. क्षयरोगाचे लवकर निदान व योग्य उपचार घेतल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्यामुळे क्षयरोगाबाबत असलेले गैरसमज दूर करून समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले.

याप्रसंगी शहर क्षयरोग अधिकारी डॉ. मोहम्मद बदीओदिन यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सुपरवायझर बालाजी साखरे, राम सोळंके व व्यंकटेश राठोड यांनी अभियानाची माहिती देत विद्यार्थ्यांना क्षयरोगमुक्त भारतासाठी सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.




यावेळी माजी प्र-कुलगुरु प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. एन. एन. कंचटवार, एनसीसी विभागप्रमुख लेफ्टनंट प्रा. श्रीकांत सोमठाणकर, प्रा. प्रियंका सिसोदिया (जीसीआय), एनसीसी कॅडेट्स तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रारंभी प्रास्ताविक डॉ. सागर कुलकर्णी यांनी केले. 'टीबी हरेल, भारत जिंकेल' या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या अभियानामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्षयरोग प्रतिबंध व जनजागृतीबाबत सकारात्मक संदेश निर्माण झाला.

शेवटी आभार जेयूओ बापूराव नवरखेले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एसयूओ रणवीर ठाकूर, जेयूओ रविकांत कांबळे, समीक्षा पावडे, संजना कांबळे यांनी परिश्रम घेतले. तसेच उपप्राचार्य प्रा. वंदना बदने, डॉ. अजय गव्हाणे, संदीप पाटील, गजानन पाटील आणि जगन्नाथ महामुने यांनी सहकार्य केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी लोकशाही दिन

**नांदेड (प्रतिनिधी)**- सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रकानुसार सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी व अडचणींना न्याय व तत्परतेने सोडवणूक मिळावी, यासाठी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. हा लोकशाही दिन सोमवार, दि. ७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १ ते ३ वाजेपर्यंतच्या कालावधीत नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, नांदेड येथे होणार आहे.

या लोकशाही दिनासाठी महसूल, जिल्हा पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, परिवहन विभाग, सहकार विभाग, कृषी विभाग तसेच पाणीपुरवठा समन्वय अधिकारी आदी जिल्हास्तरीय प्रमुख अधिकारी व त्यांच्या कार्यालयांकडे प्रलंबित असलेली प्रकरणे घेऊन संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

लोकशाही दिनाच्या दिवशी निवेदनांची नोंदणी दुपारी १२ वाजल्यापासून सुरू होणार असून, त्यानंतर प्राप्त अर्ज व निवेदनांवर ऐकूण घेण्याच्या कामास सुरुवात करण्यात येईल. नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारी व अडचणी एकत्रितरीत्या समजून घेऊन त्या शक्य तितक्या लवकर सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांनी दिली आहे.

# नवीन बी. फार्म. अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय स्तरावरील प्राध्यापक प्रशिक्षण कार्यक्रम येथे संपन्न



**लोहा (प्रतिनिधी)**- फार्मसी शिक्षणामध्ये होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर नवीन बी. फार्म. अभ्यासक्रम (२०२६) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) २०२० नुसार प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने स्कूल ऑफ फार्मसी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, डी. के. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, लोहा, नांदेड आणि विदर्भ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय राष्ट्रीय स्तरावरील प्राध्यापक विकास कार्यक्रम रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सिनेट हॉलमध्ये पार पडला.

NEP 2020 नुसार बी. फार्म अभ्यासक्रमाची (२०२६) प्रभावी अंमलबजावणी या प्रमुख विषयावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (PCI), नवी दिल्ली यांचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमास जशुभाई एच. चौधरी, (उपाध्यक्ष, फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली) डॉ. एम. के. पाटील (डीन , विज्ञान व तंत्रज्ञान ), डॉ. एस. एस. पेकमवार (संचालक, औषधं निर्माणशास्त्र संकुल), प्रा. प्रज्ञा भोसले (विभागप्रमुख, डी के पाटील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी), प्रमुख उपस्थिती डॉ. राजेश एस. शिंदे हे मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमास लाभलेले विशेष तज्ज्ञ डॉ. संजय एस. तोष्णीवाल (सदस्य, केंद्रीय परिषद, झउख, नवी दिल्ली), डॉ. बी. माधवा रेड्डी (प्राचार्य, जी पुल्ला रेड्डी कॉलेज ऑफ फार्मसी, हैदराबाद ), डॉ. सतिश पोलशेट्टीवार (सहयोगी प्राध्यापक, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे) हे उपस्थित होते.

# केआरएम महिला महाविद्यालय येथे विद्यापीठस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि के.आर.एम. महिला महाविद्यालय नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे. मा. कुलगुरू यांच्या आदेशानुसार १७ सप्टेंबर हा मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिनानिमित दिनांक ०७ सप्टेंबर, २०२६ ते २३ सप्टेबर,२०२६ या कालावधित नांदेड, हिंगोली, परभणी आणि लातूर या चार जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांत वेगवेगळे शैक्षणिक उपक्रम राबवून हा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षण व्यवस्था या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन, दि ०७ सप्टेंबर २०२६ सोमवार रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत केआरएम महिला महाविद्यालय वजिराबाद, नांदेड येथे जिल्हास्तरीय निबंध स्पर्धा आयोजित केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये या निबंध स्पर्धेत भाग घेऊ शकतात. प्रत्येक महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभाग नोंदवता येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. या निबंध स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक तसेच सहभागी प्रमाणपत्र मिळेल व पुढील चार जिल्ह्याची एक निबंध स्पर्धा विद्यापीठ स्तरावर होईल.

त्यासाठी नांदेड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे अवाहन महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.विजया देशमुख व स्पर्धेचे समन्वयक तथा मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. व्यंकटी पावडे आणि सल्लागार समितीचे सदस्य प्रा. हुमा कौसर, प्रा. डॉ. कल्याण पाटील, प्रा. डॉ. मेघराज पवार यांनी केले आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंती महोत्सव मंडळाकडून मरणोत्तर पुरस्कारांसह मान्यवरांचा सन्मान



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती महोत्सव मंडळ, सिडकोतर्फे अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या प्रांगणात दोन दिवसीय जयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मरणोत्तर पुरस्कार, विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कार, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव आणि भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले.

स्वागताध्यक्ष रमेश तालीमकर यांच्या संकल्पनेतून सामाजिक कार्यकर्ते आणि दिवंगत व्यक्तींच्या कार्याची दखल घेत मरणोत्तर पुरस्कार व विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या सोहळ्याला विधान परिषदेचे आमदार अमर राजूरकर, प्रमुख वक्ते ॲड. महादेव कांबळे, शिवा कांबळे यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

अण्णाभाऊ साठे स्मारकाच्या उभारणीत आणि सामाजिक कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कै. दिगंबर महाराज ढाकणीकर, दलित मित्र कै. गंगाधरराव वाघमारे, दलित मित्र कै. के. एन. बोराळे, दलित मित्र कै. दिगंबर घंटेवाड, कै. दिगंबर कांबळे राऊतखेडकर, कै. के. एल. ढाकणीकर, कै. रघुनाथ गायकवाड व कै. राम कोलंबीकर यांना मरणोत्तर पुरस्कार देऊन त्यांच्या सहपरिवाराचा सन्मान करण्यात आला. तसेच समाजात विशेष योगदान दिल्याबद्दल भुजंगराव गायकवाड (कार्यकारी अभियंता, सिडको प्रशासक, छत्रपती संभाजीनगर), संजय घोडजकर (सहजिल्हा निबंधक अभिलेख, मुंबई), जयप्रकाश वाघमारे (स्वीय सहाय्यक, जि. प. नांदेड), निलेश गोपाळचावडीकर (पोलीस निरीक्षक, नागपूर), गणेश वाघमारे (बीट जमादार, वाजेगाव चौकी) आणि नामदेव वाघमारे (विमानतळ, मुंबई) यांना 'समाजरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिवा कांबळे, माजी महापौर प्रतिनिधी विजय यवनकर, नगरसेवक संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, उदय देशमुख, राजू लांडगे, सतीश बसवदे, रवी पंडित, जनार्दन गुपीले, साहित्यिक महेश मोरे, सोनू दरेगावे, दलित मित्र आर. जे. वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दलित मित्र माधव अंबटवार यांनी भूषवले. प्रास्ताविक जयंती मंडळाचे अध्यक्ष अंकुश गायकवाड यांनी केले, तर सूत्रसंचालन दिगंबर शिंदे आणि बालाजी गवाले यांनी केले. स्वागताध्यक्ष रमेश तालीमकर, पप्पू गायकवाड, विठ्ठल घाटे, साहेबराव डाकोरे, नितीन वाघमारे, चंदू कांबळे, अंबादास मेकाले, आनंदा वाघमारे व साईनाथ भोसले यांनी सर्व उपस्थितांना अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावरील ग्रंथ व पुष्पहार देऊन सन्मानित केले.

# युवकांच्या मनात प्रेरणेची ज्योत चेतविणाऱ्या इंजि. शिवाजीराजे पाटील यांचा विशेष सन्मान

## अमोघ वक्तृत्व, प्रभावी लेखन आणि ऊर्जावान प्रशिक्षणातून युवा पिढीला सकारात्मक दिशा; मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिन सोहळ्यात गौरव

**तुळजापूर/ नांदेड (प्रतिनिधी)**- युवकांच्या मनात आत्मविश्वासाची ज्योत प्रज्वलित करून त्यांना सकारात्मक विचार, नेतृत्वगुण आणि विजेत्याची मानसिकता देण्यासाठी सातत्याने कार्यरत असलेले विश्वविख्यात वक्ते, लेखक तथा पत्रकार इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांचा मराठा सेवा संघाच्या वर्धापन दिन सोहळ्यात विशेष सन्मान करण्यात आला.

माईंड पॉवर, आनंदी सहजीवन, लाईफ स्किल्स, पॉवर ऑफ सबकॉन्शियस माईंड, 'लेट अस नो बेटर अवर बेटरहाफ', लिडरशिप डेव्हलपमेंट प्रोग्राम, 'स्क्रीन टू स्किल', योगा अँड मेडिटेशन, हेल्थ अँड हॅप्पीनेस, 'विनर्स माईंडसेट अगेन्स्ट लूजर्स माईंडसेट', 'झिरो टू हिरो' आदी विविध विषयांवरील प्रशिक्षण शिबिरांच्या माध्यमातून त्यांनी देश-विदेशातील युवकांमध्ये प्रेरणादायी वक्ते व प्रशिक्षक म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.




न्या. भीमराव नरवाडे पाटील व इंजि. पुरुषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमोघ वक्तृत्व, प्रभावी लेखन तसेच ऊर्जावान प्रशिक्षणाच्या माध्यमातून युवकांच्या जडणघडणीत दिलेल्या योगदानाची दखल घेत प्रेरणापुरुष शिवाजीराजे पाटील यांचा विशेष गौरव करण्यात आला. मराठा सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांसाठी त्यांनी राबविलेल्या केडर कॅम्पच्या माध्यमातून वैचारिक प्रबोधन, नेतृत्व विकास आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचेही यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

धाराशिवच्या पोलीस अधीक्षक रितू खक्कर, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडावकर, नगरसेवक सज्जन साळुंखे, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, कार्याध्यक्ष सुनील महाजन, उद्योजक रतिराम पाटील, बांधकाम व्यावसायिक विलास पाटील, इंजि. लिंबराज सूर्यवंशी, कमलेश पाटील, प्रमोद महाजन, पत्रकार दिलीप साळुंखे, गणेश कापसे, डॉ. संजय पाटील, सोपान क्षीरसागर, डॉ. गिरीश ठाकरे, प्रा. कपिल पिचेवार, गंगाधर पवार आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला.

नांदेड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षण शिबिरे ही केवळ ज्ञान देणारी माध्यमे नसून व्यक्तिमत्त्व घडविण्याची, आत्मविश्वास वाढविण्याची आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची प्रभावी प्रक्रिया आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त क्षमतांना योग्य दिशा मिळाल्यास ते स्वतःच्या आयुष्यासोबतच समाजाच्या प्रगतीतही महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकतात, असे सांगून युवकांनी सकारात्मक विचार, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि आत्मविश्वास या त्रिसूत्रीचा स्वीकार करावा, असे आवाहन युवाप्रेरणास्त्रोत शिवाजीराजे पाटील यांनी केले.

युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे, त्यांच्या विचारांना सकारात्मक दिशा देणे आणि त्यांच्यामध्ये 'विजेत्याची मानसिकता' निर्माण करणे हे आपले ध्येय असल्याचे सांगत, या कार्यासाठी भविष्यातही अधिक व्यापक स्तरावर कार्यरत राहण्याचा निर्धार इंजि. शिवाजीराजे पाटील बाभळीकर यांनी व्यक्त केला.

फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# ...तर नणंद-भावजयच्या नात्यात येणार नाही दुरावा!

## या गोष्टी लक्षात ठेवल्याने वर्षानुवर्षे टिकेल गोडवा

**नणंद आणि भावजयचे नाते प्रेम, आपुलकी आणि जिव्हाळ्याने भरलेले असू शकते. मात्र, त्यासाठी दोघींनीही काही छोट्या- छोट्या गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे. तुलना टाळणे, परस्परांचा सन्मान राखणे आणि अडचणीच्या काळात एकमेकींच्या पाठीशी उभे राहणे यामुळे हे नाते अधिक घट्ट होते. योग्य समजूतदारपणा आणि विश्वासाच्या बळावर नणंद- भावजयचे नाते वर्षानुवर्षे आनंदी आणि मधुर राहू शकते.**

नणंद आणि भावजयचे नाते कधी मैत्रीसारखे जिव्हाळ्याचे असते, तर कधी अगदी छोट्या-छोट्या कारणांवरूनही त्यात कटुता निर्माण होते. दोघींचे संगोपन, विचारसरणी आणि आयुष्यातील अनुभव वेगवेगळे असू शकतात. त्यामुळे प्रत्येक विषयावर दोघींचे एकमत असणे आवश्यक नाही. मात्र, छोट्या गोष्टी मनाला लावून घेणे किंवा कुटुंबातील एखाद्या विषयावरून गैरसमज निर्माण होणे यामुळे परिस्थिती बिघडू शकते. जर नणंद आणि भावजयने एकमेकींच्या भावनांचा आदर केला आणि काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या, तर हे नाते केवळ चांगलेच नव्हे, तर आयुष्यभरासाठी घट्ट आणि जिव्हाळ्याचे राहू शकते.



### अनावश्यक हस्तक्षेप करू नका

नणंद आणि भावजयचे नाते कितीही चांगले असले, तरी दोघींचेही स्वतःचे वैयक्तिक आयुष्य असते. प्रत्येक निर्णयात, प्रत्येक संभाषणात किंवा प्रत्येक बाबतीत आपले मत देणे आवश्यक नाही. भावजयला एखादी गोष्ट तिच्या पद्धतीने करायची असेल किंवा नणंदेला तिच्या आयुष्याशी संबंधित एखादा निर्णय स्वतः घ्यायचा असेल, तर तिच्या निर्णयाचा आदर करावा. गरज भासल्यास योग्य सल्ला द्यावा; मात्र प्रत्येक गोष्टीत आपले मत लादणे टाळावे.

### लगेच मनाला लावून घेऊनका...

एकत्र राहताना किरकोळ मतभेद किंवा नोकझोक होणे स्वाभाविक आहे. कधी एखाद्याच्या बोलण्याचा चुकीचा अर्थ घेतला जाऊ शकतो, तर कधी मनःस्थिती ठीक नसल्यामुळेही एखादी गोष्ट वाईट वाटू शकते. अशा वेळी लगेच मनात राग धरून ठेवण्याऐवजी शांतपणे परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करावा. प्रत्येक छोट्या गोष्टीला नात्यातील मोठी समस्या बनवल्यास एकमेकींमधील दुरावा वाढू शकतो.

### एकमेकींची तुलना अजिबात करू नका

'माझी भावजय तर असे करते' किंवा 'माझी दुसरी नणंद किती समजूतदार आहे' अशा प्रकारची तुलना नात्यात कटुता निर्माण करू शकते. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव, विचार करण्याची पद्धत आणि काम करण्याची शैली वेगळी असते. त्यामुळे नणंदेने आपल्या भावजयची तुलना अन्य कोणत्याही महिलेशी करू नये. त्याचप्रमाणे भावजयनेही आपल्या नणंदेची तुलना इतर कोणाशीही करणे टाळावे.

### लगेच कोणाचीही बाजू घेऊनका

कुटुंबातील एखाद्या सदस्याशी मतभेद झाल्यानंतर नणंद किंवा भावजय अनेकदा एकमेकींकडे तक्रार करतात. अशा वेळी लगेच कोणाची बाजू घेण्याऐवजी संपूर्ण परिस्थिती समजून घेणे अधिक योग्य ठरते. कुटुंबातील किरकोळ वाद वाढवण्याऐवजी ते संवादातून सोडवण्याचा प्रयत्न करावा. एकमेकींवर विश्वास ठेवला आणि गैरसमजांना वाव दिला नाही, तर नणंद-भावजयचे नाते अधिक घट्ट आणि आनंदी राहू शकते.

### एकमेकींच्या सन्मानाची काळजी घ्या

नणंद-भावजयच्या चांगल्या नात्याचा सर्वात मजबूत पाया म्हणजे परस्परांचा सन्मान. मस्करी करतानाही समोरच्या व्यक्तीला सर्वांसमोर लाज वाटेल किंवा तिचा अपमान होईल, असे बोलू नये. विशेषतः कुटुंबातील इतर सदस्यांसमोर एकमेकींच्या उणिवा सांगणे, टोमणे मारणे किंवा चेष्टा करणे टाळावे. एखादी गोष्ट सांगायची असेल तर ती एकांतात, प्रेमाने आणि आदरपूर्वक सांगावी. शब्दांची निवड योग्य असेल, तर अनेक गैरसमज टाळता येतात.

### तीन गोष्टी महत्त्वाच्या



विश्वास, आदर आणि संवाद या तीन गोष्टी नणंद-भावजयच्या नात्याला मजबूत आधार देतात. एकमेकींच्या स्वातंत्र्याचा आदर करून, मनातील गैरसमज वेळेत दूर करून आणि अडचणीच्या काळात एकमेकींच्या पाठीशी उभे राहिल्यास हे नाते केवळ कौटुंबिक नाते न राहता एका सुंदर मैत्रीतही रूपांतरित होऊ शकते.

# पांढऱ्या केसांना करेल काळे, केसगळतीही थांबवेल...

## जाणून घ्या कसे लावावे 'केशराज'...

**पावसाळा सुरू झाला की आजूबाजूला अनेक प्रकारच्या वनस्पती आणि तण मोठ्या प्रमाणावर उगवतात. यापैकीच एक वनस्पती म्हणजे भृंगराज, ज्याला आयुर्वेदात 'केशराज' असेही संबोधले जाते. केसांच्या आरोग्यासाठी भृंगराजचा वापर पारंपरिक पद्धतीने केला जातो. त्याच्या तेलाने किंवा लेपाने टाळूची निगा राखण्यास तसेच केसांची स्थिती सुधारण्यास मदत होऊ शकते. मात्र, केसगळती किंवा केस पांढरे होण्यामागे अनेक कारणे असू शकतात. त्यामुळे केवळ भृंगराजाच्या वापराने प्रत्येक समस्येवर निश्चित उपचार होतो, असे मानणे योग्य नाही.**



### भृंगराजला 'केशराज' का म्हटले जाते?

भृंगराजाचे शास्त्रीय नाव Eclipta alba किंवा Eclipta prostrata असे आहे. या वनस्पतीमध्ये वेडेलोलॅक्टोन आणि डेमिथाइलवेडेलोलॅक्टोन यांसारखी संयुगे तसेच अँटिऑक्सिडंट घटक आढळतात. केसांच्या वाढीचे मुख्यतः तीन टप्पे असतात, अॅनाजेन म्हणजे वाढीचा टप्पा, कॅटाजेन म्हणजे संक्रमणाचा टप्पा आणि टेलोजेन म्हणजे विश्रांतीचा टप्पा. प्राण्यांवर करण्यात आलेल्या काही अभ्यासांमध्ये भृंगराजाच्या अर्काचा वापर केल्यानंतर केसांच्या मुळांशी संबंधित वाढीच्या टप्प्यात सकारात्मक बदल आढळल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, हे निष्कर्ष थेट माणसांमध्येही तितकेच परिणामकारक ठरतील, असे निश्चितपणे म्हणता येत नाही.

### केसांसाठी भृंगराजाचे संभाव्य फायदे

- **»** केसांच्या वाढीस मदत होऊ शकते : भृंगराजाचा अर्क केसांच्या वाढीच्या चक्रासाठी उपयुक्त ठरू शकतो, असे काही अभ्यासांतून सूचित झाले आहे. त्यामुळे केसांची मुळे आणि त्यांची वाढ यासाठी भृंगराजाचा पारंपरिक वापर केला जातो.
- **»** टाळूच्या आरोग्यासाठी उपयुक्त : धूळ, प्रदूषण, सूर्यप्रकाश आणि इतर पर्यावरणीय घटकांमुळे केस व टाळूवर ऑक्सिडेटिव्ह ताण निर्माण होऊ शकतो. भृंगराजामधील अँटिऑक्सिडंट घटक या ताणाविरुद्ध संरक्षण देण्यास मदत करू शकतात.
- **»** केसांचा कोरडेपणा कमी करण्यास मदत : भृंगराज तेलाने टाळूची मालिश केल्याने त्वचेला आर्द्रता मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे टाळूचा कोरडेपणा कमी होऊन केस मऊ राहण्यास मदत होते.

### भृंगराजाची ओळख कशी पटवावी?

पावसाळ्यात भृंगराज ओलसर आणि दमट ठिकाणी सहज आढळतो. घराच्या परिसरात, नाल्यांच्या कडेला, अंगणात किंवा भाताच्या शेतातही तो उगवलेला दिसू शकतो. फुले लहान, गोलाकार आणि पांढऱ्या रंगाची असतात. ती आकाराने छोट्या डेझीच्या फुलांसारखी दिसतात. पाने लांबट, अरुंद आणि एकमेकांच्या समोर वाढलेली असतात. पानांचा स्पर्श काहीसा खरखरीत असतो. खोड बारीक असून ते जमिनीच्या दिशेने पसरताना दिसते. खोडाचा रंग काही वेळा लालसर-जांभळा दिसू शकतो. पानांपासून तयार केलेला अर्क काही काळानंतर गडद रंगाचा होतो. अर्थात केवळ या वैशिष्ट्यांवरून वनस्पतीची खात्रीशीर ओळख होईलच असे नाही. कारण भृंगराजासारखी दिसणारी इतर काही झाडेही असतात. त्यामुळे कोणतीही वनस्पती स्वतःहून ओळखून वापरण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे योग्य ठरते.

### भृंगराज तेलाने केसांची मालिश

- **»** भृंगराजाचा वापर तेलाच्या स्वरूपात केला जातो. आठवड्यातून एक किंवा दोन वेळा हे तेल टाळूला लावून हलक्या हाताने मालिश करता येते. तेल रात्रभर ठेवणे आवश्यक नाही. काही वेळाने केस धुऊन घेता येतात.
- **»** साहित्य : १०० मिली नारळाचे किंवा तीळाचे तेल, २ चमचे भृंगराज पावडर किंवा मूठभर ताजी भृंगराजाची पाने, १ चमचा मेथीदाणे, १० ते १५ कढीपत्त्याची पाने.
- **»** तेल तयार करण्याची पद्धत : जाड बुडाच्या भांड्यात तेल मंद आचेवर गरम करा. त्यात मेथीदाणे आणि कढीपत्त्याची पाने घाला. त्यानंतर भृंगराजाची पावडर घाला आणि मंद आचेवर शिजू द्या. ताजी भृंगराजाची पाने वापरत असल्यास त्यातील ओलावा पूर्णपणे निघून जाईपर्यंत मिश्रण गरम करा. मिश्रण थंड झाल्यानंतर स्वच्छ कापडाने गाळून काचेच्या स्वच्छ बाटलीत साठवा.



### भृंगराज-दह्याचा केसांसाठी लेप

- **»** केसगळतीची समस्या मोठ्या प्रमाणात असल्यास केवळ तेलाचा वापर पुरेसा ठरेलच असे नाही. भृंगराज पावडर आणि दही यांचा लेपही पारंपरिक पद्धतीने वापरला जातो. दह्यामध्ये लॅक्टिक अ‍ॅसिड असल्याने टाळू स्वच्छ ठेवण्यास मदत होऊ शकते, तर भृंगराज पावडर केसांच्या निगेसाठी वापरली जाते.
- **»** साहित्य : २ चमचे भृंगराज पावडर, १ चमचा दही.
- **»** वापरण्याची पद्धत : भृंगराज पावडर आणि दही एकत्र करून घट्ट लेप तयार करा. हा लेप टाळूवर लावून १५ ते २० मिनिटे ठेवा. त्यानंतर कोमट पाण्याने केस स्वच्छ धुवा.

### भृंगराज पांढरे केस काळे करतो का?

आयुर्वेदिक परंपरेत भृंगराजाचा वापर केसांचे आरोग्य सुधारण्यासाठी तसेच अकाली पांढरे होणाऱ्या केसांच्या निगेसाठी केला जातो. भृंगराजाच्या पानांपासून गडद रंगाचा अर्क मिळतो. मात्र, भृंगराज तेल लावल्याने पांढरे झालेले केस कायमचे काळे होतात, असे ठोसपणे सांगता येत नाही. केस पांढरे होण्यामागे वय, आनुवंशिकता, पोषणातील कमतरता आणि इतर अनेक कारणे असू शकतात. त्यामुळे पांढरे केस काळे करण्यासाठी केवळ भृंगराजावर अवलंबून राहणे योग्य नाही. नियमित आणि योग्य पद्धतीने वापर केल्यास मात्र केसांची निगा राखण्यास आणि त्यांना मऊ व चमकदार ठेवण्यास मदत होऊ शकते.



### ही काळजी घ्या...

भृंगराज नैसर्गिक वनस्पती असली तरी प्रत्येक व्यक्तीला त्याचा वापर अनुकूल असेलच असे नाही. त्यामुळे तेल किंवा लेप वापरण्यापूर्वी त्वचेची चाचणी (पॅच टेस्ट) करणे महत्त्वाचे आहे. कानामागील किंवा हाताच्या आतील बाजूच्या छोट्या भागावर थोडेसे मिश्रण लावून पाहा. लालसरपणा, खाज, जळजळ किंवा पुरळ यांसारखी लक्षणे दिसल्यास त्याचा वापर करू नका. टाळूवर आधीपासून जखम, संसर्ग किंवा त्वचेची संवेदनशीलता असल्यास डॉक्टरांचा सल्ला घेतल्याशिवाय भृंगराजाचा वापर करू नये. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, केस मोठ्या प्रमाणात गळत असतील तर त्यामागील मूळ कारण शोधणे गरजेचे आहे. हार्मोन्समधील बदल, पोषणातील कमतरता, ताणतणाव, काही आजार किंवा औषधांचे दुष्परिणाम यांसह अनेक कारणांमुळे केसगळती होऊ शकते. अशा वेळी केवळ भृंगराजाचा वापर करण्याऐवजी त्वचारोग तज्ज्ञांचा सल्ला घेणे अधिक योग्य ठरेल.

# कळणार नाही तुम्ही मेकअप केलाय...

## नैसर्गिक सौंदर्यासाठी असा करा 'नो-मेकअप लुक'; जाणून घ्या प्रत्येक टप्पा...

**मेकअप केल्यानंतर चेहरा सुंदर दिसावा; पण मेकअप केला आहे हे समोरच्या व्यक्तीला जाणवूही नये, असे तुम्हाला वाटते का? मग तुमच्यासाठी 'नो-मेकअप लुक' योग्य पर्याय ठरू शकतो. नावाप्रमाणेच या मेकअपमध्ये चेहरा अगदी नैसर्गिक दिसतो. मात्र, हा लुक साध्य करण्यासाठी नेहमीच्या मेकअपपेक्षा थोडी वेगळी पद्धत वापरावी लागते. कार्यालयात जायचे असो किंवा एखाद्या औपचारिक कार्यक्रमासाठी तयार व्हायचे असो, चेहऱ्यावर खूप मेकअप केल्यास तो उठून दिसतो. अशावेळी चेहऱ्यावरील डाग, लालसरपणा किंवा डोळ्यांखालील काळवंडलेपणा लपवूनही त्वचेचा नैसर्गिक पोत कायम ठेवणे महत्त्वाचे असते. 'नो-मेकअप लुक'मध्ये संपूर्ण चेहऱ्यावर फाउंडेशनचा जाड थर लावला जात नाही. गरज असेल तिथेच फाउंडेशन किंवा कन्सीलरचा वापर केला जातो. ब्लश, ब्रॉन्झर, भुवया आणि मस्कारा यांचाही अगदी मोजून वापर केला जातो. त्यामुळे चेहरा सजलेला असूनही तो नैसर्गिक दिसतो.**

- **»** त्वचेची काळजी घेऊन सुरुवात करा : कोणत्याही प्रकारचा मेकअप करण्यापूर्वी त्वचेची तयारी अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या त्वचेच्या प्रकारानुसार चेहरा स्वच्छ करणे, टोनर वापरणे आणि मॉइश्चरायझर लावणे या तीन गोष्टी करा. जर तुम्ही हायड्रेटिंग सीरम वापरत असाल, तर ते अगदी थोड्या प्रमाणात लावा. स्किन प्रेपचा उद्देश चेहरा अतिशय चमकदार किंवा तेलकट बनवणे नसून त्वचेला पुरेसा ओलावा देऊन मेकअपसाठी तयार करणे हा आहे. त्वचेवर पुरळ, लालसरपणा किंवा इतर कोणतीही समस्या असल्यास त्यानुसार उत्पादने निवडा.
- **»** चेहऱ्याला नैसर्गिक आकार देण्यासाठी ब्रॉन्झर वापरा : सामान्य मेकअपमध्ये अनेकदा कलर करेक्टर आणि फाउंडेशनपासून सुरुवात केली जाते. मात्र, नो-मेकअप लुकमध्ये तुम्ही हलका आणि पारदर्शक दिसणारा क्रीम ब्रॉन्झर वापरू शकता. गालाच्या हाडापासून चेहऱ्याच्या बाहेरील बाजूकडे ब्रॉन्झर लावत जा. कपाळ आणि कानाजवळील भागावरही तो हलक्या हाताने लावा. त्यानंतर ब्रशच्या मदतीने केसांच्या रेषेकडे व्यवस्थित मिसळा. जॉलाइनवरही ब्रॉन्झर हलक्या हाताने लावून व्यवस्थित मिसळा. यामुळे चेहऱ्याला नैसर्गिक आकार आणि उठाव मिळतो.
- **»** गरज असेल तिथेच फाउंडेशन किंवा कन्सीलर लावा : नो-मेकअप लुकमध्ये संपूर्ण चेहऱ्यावर फाउंडेशनचा थर लावण्याची गरज नाही. चेहरा नीट पाहा आणि ज्या भागात फाउंडेशन किंवा कन्सीलरची आवश्यकता आहे, तिथेच त्याचा वापर करा. चेहऱ्यावर लालसरपणा, डाग किंवा



किरकोळ खुणा असतील तर त्या भागावर थोडेसे उत्पादन लावा. त्यासाठी कन्सीलरही वापरता येईल. मेकअप लावताना त्वचेचा नैसर्गिक पोत पूर्णपणे झाकण्याचा प्रयत्न करू नका. ब्रश किंवा मेकअप ब्लेंडरच्या मदतीने हलक्या हाताने थोपटत उत्पादन मिसळा.
- **»** डोळ्यांखाली कन्सीलर लावताना काळजी घ्या : डोळ्यांखालील काळवंडलेपणा कमी करण्यासाठीही हाच नियम लागू होतो. मात्र, भरपूर कन्सीलर लावून डोळ्यांखालील भाग खूप पांढरा किंवा उठावदार करण्याचा प्रयत्न करू नका. ब्रशवर उरलेले थोडेसे उत्पादनही डोळ्यांखालील भागासाठी पुरेसे ठरू शकते. या लुकमध्ये डोळ्यांखालील भाग अतिशय उठावदार करण्याऐवजी नैसर्गिक ठेवणे महत्त्वाचे आहे.
- **»** ब्लश नैसर्गिक लालसरपणा असलेल्या भागावरच लावा : नो-मेकअप लुकमध्ये नेहमीच्या पद्धतीने गालाच्या हाडावर जास्त ब्लश लावण्याची गरज नाही. मेकअप करण्यापूर्वी आपल्या गालांवर नैसर्गिक लालसरपणा नेमका कुठे दिसतो ते पाहा. साधारणपणे हसताना गालांचा जो भाग अधिक उठून दिसतो, तिथेच नैसर्गिक लालसरपणा जाणवतो. त्याच भागावर अगदी थोड्या प्रमाणात ब्लश लावा. नेमके कुठे लावायचे हे समजत नसेल, तर गालांच्या फुगलेल्या भागावर हलका ब्लश लावणे पुरेसे आहे. ब्रशवर उरलेला ब्लश अगदी थोड्या प्रमाणात नाकाच्या आसपास आणि कपाळावर ब्रॉन्झरसह मिसळू शकता. त्यामुळे चेहऱ्याला अधिक नैसर्गिक रंग मिळतो.
- **»** पावडरचा वापर कमीत कमी करा : मेकअप टिकवण्यासाठी साधारणपणे पावडरचा वापर केला जातो. मात्र, नो-मेकअप लुकमध्ये पावडरचा अतिवापर टाळणे आवश्यक आहे. पावडर वापरायचीच असल्यास अगदी पातळ थर लावा. विशेषतः डोळ्यांखाली किंवा तेलकट त्वचेच्या टी-झोन भागात थोडी पावडर वापरू शकता. क्रीमयुक्त उत्पादने लावल्यानंतर ती व्यवस्थित मिसळल्याची खात्री करा.

# तब्बल ५२ मंदिरांमध्ये स्मार्टफोन बॅन; सेल्फी आणि रीलवर सुद्धा बंदी

**नवीदिल्ली(वृत्तसंस्था)**–तामिळनाडू सरकारने राज्यातील ५२ प्रमुख मंदिरांमध्ये स्मार्टफोनच्या वापरावर बंदी घातली आहे. हा नियम लागू सुद्धा झाला आहे. नवीन नियमानुसार, भाविकांना मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी त्यांचे स्मार्टफोन काउंटरवर जमा करावे लागतील. प्रत्येक फोनसाठी ५ रुपये शुल्क आकारले जाईल. कॅमेरा नसलेले मोबाईल फोन मंदिरात नेण्यास परवानगी असेल. मंदिराच्या आवारात फोटो काढणे, रील बनवणे आणि व्हीडीओ रेकॉर्ड करण्यास मनाई आहे. या नियमानुसार, व्हीआयपी, सेलिब्रिटी आणि प्रसिद्ध व्यक्तींचे फोटो किंवा व्हिडिओ काढण्यासही परवानगी दिली जाणार नाही. हिंदू धार्मिक आणि धर्मादाय मंत्री (एचआर अँड सीई) रमेश यांनी ही माहिती दिली.

हा निर्णय २ डिसेंबर २०२२ रोजी मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपीठाने दिलेल्या आदेशाच्या आधारे जारी करण्यात आला. भाविक, विशेषतः तरुण, मंदिराच्या आवारात फोटो काढणे, रील बनवणे आणि व्हीडीओ रेकॉर्ड करत



असल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती. मंत्र्यांनी सांगितले की, कॅमेरा नसलेले मोबाईल फोन मंदिरात नेण्यास परवानगी असेल. मंदिरांची पवित्रता आणि शांततापूर्ण वातावरण टिकवून ठेवणे हा या नवीन नियमाचा उद्देश आहे. कांचीपुरम येथील प्रसिद्ध देवराजस्वामी-अथी वरदर मंदिरात मंगळवारी सकाळी ६ वाजता ही व्यवस्था लागू करण्यात आली. फोन गोळा करण्यासाठी दोन संगणक ऑपरेटर आणि दोन कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. एका जनहित याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर उच्च न्यायालयाने हा आदेश जारी केला.

तिरुचेंदूर येथील अरुलमिगु सुब्रमण्य स्वामी मंदिरात स्मार्टफोनच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर उच्च न्यायालयाने हा आदेश जारी केला. यापूर्वी, मंदिरांना मोबाईल फोनवर बंदी घालण्याचे आणि त्यांच्या सुरक्षेची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले होते. हाच नियम व्हीआयपींनाही लागू होतो. मंदिराच्या प्रवेशद्वारावर आणि मंदिराच्या आवाराबाहेर मोबाईल फोनच्या वापरावर बंदी असल्याची माहिती देणारे फलक लावण्याचे निर्देश मंदिर अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. तसेच, ध्वनीक्षेपकाद्वारे (लाऊडस्पीकर) या नियम ाबद्दल भक्तांना माहिती देण्याचे निर्देशही त्यांना देण्यात आले आहेत. एचआर अँड सीई विभागाने मंदिर परिसरात देवतांचे फोटो काढण्यावर, व्हिडिओ बनवण्यावर आणि धार्मिक विधींचे चित्रीकरण करण्यावरही बंदी घातली आहे.

# निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा राम मंदिर ट्रस्टचे पहिले सीईओ नियुक्त



**नवीदिल्ली (प्रतिनिधी)**–प्रशासकीय कामकाज अधिक मजबूत आणि सुव्यवस्थित करण्यासाठी, श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने निवृत्त एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची आपल्या पहिल्या पूर्णवेळ मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) पदावर नियुक्ती केली आहे. मंदिर व्यवस्थापनाला बळकटी देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

**प्रशासकीय सुधारणा आणि पार्श्वभूमी**

नुकत्याच समोर आलेल्या निधी व्यवस्थापनाच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर ट्रस्टने आपले प्रशासकीय कामकाज अधिक पारदर्शक आणि मजबूत करण्याचे ठरवले आहे. याच उद्देशासाठी यावर्षी जुलैमध्ये सीईओ पदासाठी अर्ज मागवण्यात आले होते. एका उच्चस्तरीय शोध समितीने तीन पात्र उमेदवारांची नावे शॉर्टलिस्ट करून ट्रस्टकडे सादर केली होती, ज्यामधून एअर मार्शल मिश्रा यांची अंतिम निवड करण्यात आली.

**एअर मार्शल जितेंद्र मिश्रा यांची कारकीर्द**

संरक्षण सेवा: मिश्रा ६ डिसेंबर १९८६ रोजी लढाऊ वैमानिक (फायटर पायलट) म्हणून भारतीय हवाई दलात रुजू झाले.

प्रमुख शैक्षणिक पार्श्वभूमी: ते पुणे येथील राष्ट्रीय संरक्षण अकादमी (ND), बंगळूर येथील एअर फोर्स टेस्ट पायलट्स स्कूल, अमेरिकेतील एअर कमांड अँड स्टाफ कॉलेज आणि युकेमधील रॉयल कॉलेज ऑफ डिफेन्स स्टडीजचे माजी विद्यार्थी आहेत.

अनुभव: फायटर कॉम्बॅट लीडर असलेल्या मिश्रा यांना ३,००० तासांहून अधिक उड्डाणाचा अनुभव आहे. त्यांनी आपल्या ३८ वर्षांच्या दिर्घ कारकिर्दीत फायटर स्क्वाड्रनचे नेतृत्व करणे, चीफ टेस्ट पायलट म्हणून काम पाहणे तसेच पश्चिम हवाई कमांडचे प्रमुखपद अशा अनेक महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांच्या नियुक्तीमुळे राम मंदिराचे संपूर्ण प्रशासन, व्यवस्थापन आणि निधीविषयक कामकाज अधिक शिस्तबद्ध व पारदर्शक होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# यमुनेच्या पात्रात आर्मीची बोट उलटली, स्पेशल फोर्सेसचे दोन जवान बेपत्ता!



**हरियाणा(वृत्तसंस्था)**–हरियाणातील यमुनानगर जिल्ह्यातील हथणीकुंड बॅरेजवर मंगळवारी रात्री एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. रात्रीच्या प्रशिक्षण सरावादरम्यान भारतीय सैन्याची एक बोट यमुनेच्या पात्रात उलटली. या बोटीत '१ पॅरा स्पेशल फोर्सेस'चे पाच जवान सवार होते, त्यापैकी दोन जवान पाण्याच्या तीव्र प्रवाहात वाहून गेल्याने बेपत्ता झाले आहेत. सैन्य दलाने दिलेल्या माहितीनुसार, रात्रीच्या सरावादरम्यान अचानक बोटीमध्ये तांत्रिक बिघाड झाला. तांत्रिक बिघाडामुळे बोट नियंत्रणाबाहेर गेली आणि पाण्याच्या तीव्र प्रवाहात व भोवऱ्यात अडकून बॅरेजच्या दरवाजाजवळ पलटली.

या दुर्घटनेनंतर तीन जवानांनी अत्यंत धैर्याने पाण्याचा प्रचंड वेग झेलत पोहून सुरक्षितपणे किनार गाठला, परंतु उर्वरित दोन जवान पाण्याच्या तीव्र प्रवाहामुळे पुढे वाहून गेले.

बेपत्ता झालेल्या दोन्ही जवानांचा शोध घेण्यासाठी सध्या युद्धपातळीवर मोठी शोधमोहीम राबवली जात आहे. भारतीय सैन्य, भारतीय हवाई दल, एनडीआरएफ, हरियाणा आणि उत्तर प्रदेशची एसडीआरएफ पथके, स्थानिक पोलीस आणि जिल्हा प्रशासन संयुक्तपणे हे बचावकार्य करत आहेत. जवानांच्या शोधामध्ये मदत व्हावी म्हणून हवाई दलाच्या दोन हेलिकॉप्टर्सद्वारे बॅरेज आणि परिसरातील कालव्यांची हवाई पाहणी केली जात आहे. प्रतापनगर पोलीस ठाण्याचे निरीक्षक रोहताश यांनी दिलेल्या माहितीनुसार, बहुअंगीय यंत्रणांचे प्रयत्न सातत्याने सुरू असून अद्याप बेपत्ता जवानांचा शोध लागलेला नाही. पाण्यात उतरून शोधकार्य अधिक सुलभ करता यावे, यासाठी लष्कराच्या विनंतीवरून हरियाणा पाटबंधारे विभागाने हथणीकुंड बॅरेज आणि मुख्य कालव्यांमधील पाण्याचा विसर्ग कमी केला आहे.

# मुंबईसह तीन विद्यापीठांत आता 'कुलपती पदक'

**राज्यपाल वर्मा यांच्या हस्ते मुंबई, पुणे, नागपूर विद्यापीठांना प्रत्येकी १० लाखांचा धनादेश**

**मुंबई (प्रतिनिधी)**– विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रातील मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात आता 'कुलपती पदक' प्रदान करण्यात येणार आहे. राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती जिष्णु देव वर्मा यांच्या पुढाकाराने सुरू करण्यात येत असलेल्या या उपक्रमासाठी राज्यपालांच्या हस्ते तिन्ही विद्यापीठांच्या कुलगुरूंना प्रत्येकी १० लाख रुपयांचा प्रातिनिधिक धनादेश बुधवारी लोकभवन, मुंबई येथे प्रदान करण्यात आला.

या वेळी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते 'इन्स्टिट्यूट ऑफ हायर अँड डिजिटल लर्निंग : इंडस्ट्री-अॅकॅडेमिया कोलॅबोरेशन फॉर इम्प्रूव्हिंग एम्प्लॉयेबिलिटी' या उपक्रमाचाही शुभारंभ करण्यात आला.

'कुलपती पदक' हे केवळ शैक्षणिक गुणवत्तेपुरते मर्यादित न ठेवता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्वाची, नेतृत्वगुणांची, नवोन्मेषाची, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील काम गिरीची, सामाजिक बांधिलकीची आणि विद्यापीठासाठीच्या विशेष योगदानाची दखल घेणारे असावे, अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली आहे. पदकासाठी विद्यार्थ्यांची निवड करण्यासाठी विद्यापीठांनी पारदर्शक आणि गुणवत्ताधिष्ठित निकष निश्चित करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# कॉंग्रेस जिल्हाध्यक्षांच्या नाशिकमधील १० दिवसांच्या निवासी प्रशिक्षण शिबिराचा राहुल गांधींच्या उपस्थितीत समारोप



**नवीदिल्ली (प्रतिनिधी)**– काँग्रेसच्या 'संघटन सृजन अभियाना-अंतर्गत जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षांची निवड व नियुक्ती प्रक्रियेचा भाग म्हणून नाशिक १० दिवसीय निवासी प्रशिक्षण शिबिराचा आज लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली समारोपाचा कार्यक्रम झाला. दि. २४ ऑगस्टपासून हे शिबीर सुरु होते.

राहुल गांधी यांचे सकाळी ओझर विमानतळावर आगमन झाले. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील यांच्यासह वरिष्ठ नेत्यांनी त्यांचे स्वागत केले.

त्यानंतर राहुल गांधी यांनी एमटीडीसी रिसॉर्टमध्ये सुरु असलेल्या शिबिरस्थळी राहुल गांधी यांनी राज्यातील वरिष्ठ नेत्यांशी चर्चा केली. या बैठकीला प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेतील काँग्रेस पक्षाचे गट नेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात, नसीम खान, खा. चंद्रकांत हंडोरे, माणिकराव ठाकरे, खा. रजनीताई पाटील, मुंबई काँग्रेस अध्यक्षा वर्षा गायकवाड, प्रणिती शिंदे, डॉ. विश्वजीत कदम, प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष मोहन जोशी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव बी.एम. संदीप, रेहाना चिश्ती, वामशी रेड्डी उपस्थित होते.

या बैठकीनंतर राहुल गांधी यांनी काँग्रेस जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. त्यानंतर शिबिराच्या सम ारोपाच्या कार्यक्रमात जिल्हा काँग्रेस कमिटी अध्यक्षांशी संवाद साधला तसेच संगठन विस्तार व काँग्रेसचा विचार वर्वदूर पोहचवण्याचे आवाहन केले. त्यानंतर त्यानी जिल्हाध्यक्षांना जिजित्सू मार्शल आर्ट्सची माहिती प्रात्याक्षिकासह दिली.

# लेकींच्या शिक्षणासाठी ४७ वर्षीय आईने जिंकली ३ किमीची शर्यत!

**पुणे (प्रतिनिधी)**– मुलांच्या भविष्यासाठी आई कोणत्याही संकटाला साम ोरं जाण्यास तयार असते, याचं प्रेरणादायी उदाहरण पुण्यात समोर आलं आहे. ४७ वर्षीय रामाबाई रणवीर यांनी आपल्या दोन मुलींच्या शिक्षणासाठी चक्क अनवाणी ३ किलोमीटर धावत शर्यत जिंकली. विशेष म्हणजे, आयुष्यात पहिल्यांदाच त्या धावण्याच्या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या.

रामाबाई यांना शर्यत म्हणजे नेमकं काय, याचीही कल्पना नव्हती. शर्यतीत प्रथम क्रमांक मिळवणाऱ्याला ३ हजार रुपये बक्षीस मिळणार असल्याचं त्यांना समजलं आणि मुलींच्या शिक्षणासाठी पैसे मिळतील या विचाराने त्यांनी स्पर्धेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

रामाबाई बीड येथील ज्ञानदीप अकादम ीत स्वयंपाकघरात काम करतात. त्या दररोज २०० हून अधिक पोळ्या बनवतात आणि त्यांना महिन्याला ९ हजार रुपये पगार मि ळतो. पतीच्या निधनानंतर २०१२ पासून त्या आपल्या दोन मुलींच्या शिक्षणाची जबाबदारी



एकट्या सांभाळत आहेत. २८ ऑगस्ट रोजी त्यांची धाकटी मुलगी आरती (२०) हिने फोन करून जेवण आणि घरभाड्यासाठी पैसे मागितले. मात्र, रामाबाईंकडे त्यावेळी देण्यासाठी पैसे नव्हते. त्यामुळे त्या रात्रभर चिंतेत होत्या.

रामाबाई यांनी ना धावण्याचा सराव केला होता, ना त्यांच्याकडे स्पोर्ट्स शूज होते. त्या साडी नेसूनच शर्यतीसाठी उतरल्या. धावताना त्यांची चप्पलही तुटली. मात्र, त्यांनी माघार घेतली नाही. चप्पल बाजूला काढून त्यांनी अनवाणी ३ किलोमीटर अंतर पूर्ण केलं. शर्यत जिंकण्यासाठी त्यांच्या मनात केवळ एकच विचार होता मुलींच्या शिक्षणासाठी पैसे मिळवायचे.

रामाबाई यांनी ३० वर्षांवरील गटात शर्यत जिंकली. आयोजकांनी त्यांच्या जिद्दीने प्रभावित होऊन त्यांना अपेक्षित ३ हजार रुपयांऐवजी ५ हजार रुपयांचं बक्षीस दिलं. या पैशांतून त्यांनी मोठी मुलगी पूजासाठी वह्या-पेन खरेदी केले, तर उरलेले पैसे धाकटी मुलगी आरतीच्या शिक्षणासाठी ठेवले.

रामाबाईंची मोठी मुलगी पूजा (२२) हिनेही १८ ते ३० वयोगटातील शर्यतीत दुसरा क्रमांक मिळवत २ हजार रुपयांचं बक्षीस जिंकलं. ज्ञानदीप अकादमीचे प्रमुख दत्ता दराडे यांनी रामाबाईंच्या जिद्दीचं कौतुक केलं. अकादमीने पूजाला मोफत प्रवेश देण्यासोबतच रोजगार आणि राहण्यासाठी खोलीची सुविधाही दिली आहे.

# राष्ट्रीय सेवा योजना पुस्तकाबाहेरचं शिक्षण देतं –प्राचार्य डॉ. वसंत बिरादार



**अहमदपूर(प्रतिनिधी)** –विद्यार्थ्यांवर शाळा महाविद्यालयातून अभ्यासक्रमाच्या पुस्तकां-तील संस्कार होतात. मात्र राष्ट्रीय सेवा योजनेमुळे पुस्तकांबाहेरचं शिक्षण देतं अन् त्यातून जग कळतं, असे प्रतिपादन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखक, समीक्षक तथा ज्येष्ठ पत्रकार प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील यांनी केले.

येथील महात्मा फुले महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजना उद्बोधन कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून ते बोलत होते. यावेळी किसान पीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा नॅक कॉर्डिनेटर डॉ. दुर्गादास चौधरी, प्रमुख पाहुणे राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी कार्यक्रमाधिकारी व अनुवादक डॉ. पांडुरंग चिलगर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे सहकार्यक्रमाधिकारी ह. भ. प. डॉ. अनिल महाराज मुंढे, विद्यार्थी प्रतिनिधी कु. वैष्णवी मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना प्राचार्य डॉ. वसंत बिरादार पाटील म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवेची भावना वाढीस लागते. विविध उपक्रमातून खऱ्या अर्थाने राष्ट्रासह देशाची सेवा करण्याची संधी या माध्यमातून विद्यार्थ्यांनी निश्चित साधावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. पांडुरंग चिलगर यावेळी बोलताना म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यावर श्रमाचे संस्कार करते. तसेच विद्यार्थ्यांचे जीवन अंतर्बाह्य बदलून व्यक्तिमत्त्वाची जडणघडण राष्ट्रीय सेवा योजनाच करते, असेही ते म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. बब्रुवान मोरे यांनी केले, तर शेवटी सर्वांचे आभार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. संतोष पाटील यांनी मानले.

# ओडिशात मुसळधार पावसाचा कहर; भिंती कोसळून ३ जणांचा मृत्यू



**भुवनेश्वर (प्रतिनिधी)**– ओडिशात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, मंगळवारी वेगवेगळ्या ठिकाणी भिंती कोसळण्याच्या घटनांमध्ये तीन जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये अवघ्या तीन वर्षांच्या चिमुकल्याचाही समावेश आहे. मयूरभंज आणि संबलपूर जिल्ह्यांत या दुर्घटना घडल्या. राज्यात सध्या अतिवृष्टीचा जोर असून, भारतीय हवामान विभागाने (IMD) पुढील २४ तासांसाठी सुंदरगड, क्योंझर आणि मयूरभंज जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट जारी केला आहे.

मयूरभंज जिल्ह्यातील मटकाम दिही गावात पहाटे सुमारे ४ वाजता घराची मातीची भिंत आणि कौले कोसळून ४९ वर्षीय सिंगो मुर्मू यांचा मृत्यू झाला. त्या घरात झोपलेल्या असताना ही दुर्घटना घडली. बांगीरिपोसी परिसरातही अशीच घटना घडली. भुलनपूर गावातील लक्ष्मी सिंह या घरातील सामान बाहेर काढत असताना कमकुवत झालेली मातीची भिंत अचानक त्यांच्यावर कोसळली. या दुर्घटनेत त्यांचा मृत्यू झाला.

संबलपूर जिल्ह्यातील गोविंदपूर न्यू कॉलनीमध्ये मातीची भिंत कोसळून तीन वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे भिंत कमकुवत झाली होती. मंगळवारी दुपारी अचानक भिंत कोसळली आणि त्याखाली चिमुकला अडकला.

यंदा ओडिशात पावसाने जूनच्या सुरुवातीपासूनच विक्रमी स्थिती निर्माण केली आहे. १ जून ते ३१ ऑगस्टदरम्यान राज्यात १,१५४.३ मिमी पाऊस नोंदवला गेला. या कालावधीतील सामान्य पर्जन्यमान १,१५०.२ मिमी आहे. त्यामुळे सप्टेंबर महिना सुरू होण्यापूर्वीच राज्याने संपूर्ण जून-सप्टेंबर मान्सूनच्या सरासरी पावसाची मर्यादा किंचित ओलांडली आहे. जूनमध्ये राज्यात ४७ टक्के पावसाची तूट होती. मात्र जुलैमध्ये सरासरीपेक्षा तब्बल ९१ टक्के आणि ऑगस्टमध्ये १५ टक्के अधिक पाऊस झाल्याने जूनमधील तूट भरून निघाली. मयूरभंज जिल्ह्यातील बांगीरिपोसी येथे २४ तासांत ३०९.२ मिमी पावसाची नोंद झाली असून, हा राज्यातील सर्वाधिक पाऊस ठरला आहे. १३ ते २६ ऑगस्टदरम्यान राज्यातील १० जिल्ह्यांमधील १,८९५ गावांतील १३.५ लाखांहून अधिक नागरिकांना पुराचा फटका बसला. या कालावधीत बुडणे, भिंत कोसळणे, सर्पदंश आणि पुराच्या पाण्यात वाहून जाणे अशा विविध घटनांमध्ये २७ जणांचा मृत्यू झाला

## 'अमृताहुनी गोड'मधून ज्येष्ठ संगीत मान्यवरांचा ७ रोजी सन्मान व स्वरसोहळा

**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने सन २०२५-२६ मध्ये आपल्या वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या अथवा ७५ व्या वर्षात पदार्पण केलेल्या संगीत क्षेत्रातील मान्यवर कलाकारांचा सन्मान तसेच त्यांनी गायलेल्या, स्वरबद्ध केलेल्या आणि संगीत संयोजन केलेल्या गीतांचा व नृत्याचा विशेष स्वरसोहळा 'अमृताहुनी गोड' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सोमवार, ७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६.३० वाजता विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह येथे हा विशेष कार्यक्रम होणार आहे. संगीत क्षेत्रातील प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानाबद्दल ज्येष्ठ कलाकारांचा सन्मान करणे, त्यांच्या कलाकृतींचे स्मरण करणे आणि त्यांच्या सांगीतिक योगदानाचा नव्या पिढीशी परिचय करून देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.


## Change In Name


My Old Name is **DIGAMBER DULAJI INGOLE** which now I am changing as New Name **DIGAMBAR DULAJI INGOLE** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same. **Sign By-DIGAMBAR DULAJI INGOLE. Address-YSHODA NIVAS, NEAR VISHVASHANTI BUDDHA VIHAR, SHOBHA NAGAR ROAD, VAISHAKHI NAGAR TARODA BK. 431605 TQ. & DIST, NANDED MAHARASHTRA. MO. 9423441593**

## Change In Name

My Old Name is **FAROOQUI MOHAMMAD ISMAILODDIN** which now I am changing as New Name **MD ISMAILODDIN FAROOQUI MD WAHIDODDIN** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.
**Address-H. NO. 1076/1, FAROOQUI STREET BILOLI, TQ, BILOLI, DIST. NANDED-431710 MAHARASHTRA MO. NO. 9922702436**

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८


## जाहीर प्रगटन

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बिलोली यांचे न्यायालय किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १९०/२०२६ सुजाता भ्र. सुरेश लिमशेट्टे व इतर वि. निरंक
अर्जदार : १. सुजाता . सुरेश लिमशेट्टे वय ४५ वर्षे २. मोहिनी भ्र. विकास गोपछेडे वय – २९ वर्षे ३. चंद्राबाई ध. हणमंत लिमशेट्टे वय ७८ वर्षे.

अर्जदार क्र. १ व ३ रा. हुनगुंदा ता. बिलोली जि. नांदेड अर्जदार क्र. २ रा. कोल्हे बोरगाव ता. बिलोली जि. नांदेड

विरुध्द

निरंक

विषय १– वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत सुरेश पि. हणमंतराव लिमशेट्टे यांची अर्जदार क्र. १ ही कायदेशीर पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ही विवाहीत मुलगी आहे. अर्जदार क्र. ३ ही मयत सुरेश पि. हणमंतराव लिमशेट्टे यांची आई आहे. अर्जदार क्र. १ व ३ रा हुनगुंदा ता. बिलोली जि. नांदेड अर्जदार क्र. ३ रा. कोल्हे बोरगाव ता. बिलोली जि. नांदेड. मयत सुरेश पि. हणमंतराव लिमशेट्टे यांचा मृत्यु दिनांक ११/०३/२०२६ रोजी अपघातात जखमी झाल्यामुळे मेडीकव्हर हॉस्पीटल यलमोगुंटा एल. आय. सी. बिल्डींग निजामाबाद तेलंगणा जिल्हा निजामाबाद येथे उपचारा दरम्यान झाला. मयत सुरेश पि. हणमंतराव लिमशेट्टे यांचे अर्जदारा व्यतीरिक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत सुरेश पि. हणमंतराव लिमशेट्टे यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत दिनांक ०९/१०/२०२६ रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा, अन्यथा कोणासही कांही आक्षेप / उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील. आज दि.०१ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, बिलोली

**रामबाण ईलाज**
वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.
:: पत्ता ::
**सेवा क्लिनीक**
गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९
संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१
तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# महापालिकेत समृद्धी महामार्ग अंतर्गत वाजेगाव ते बाफना टी-पॉईंट पुलाच्या कामाचा आढावा

## महापौरांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वाची बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)-** समृद्धी महामार्ग प्रकल्पांतर्गत नांदेड शहरात तयार होत असलेल्या वाजेगाव ते बाफना टी-पॉईंट दरम्यानच्या पुलाच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महानगरपालिकेत दि. २ सप्टेंबर रोजी महापौर कविता मुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. सदरील पुलाचे काम करत असताना घ्यावयाच्या विविध उपाययोजना आणि आवश्यक खबरदारीबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली.

वाजेगाव ते बाफना टी-पॉईंट दरम्यान होणारा हा पूल शहराच्या दळणवळणाच्या आणि भविष्यातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. मात्र, या पुलाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू असताना स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासकीय पातळीवर पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर महापौरांनी पुढाकार घेत या विशेष बैठकीचे आयोजन केले होते.

बैठकीदरम्यान पुलाच्या बांधकाम क्षेत्रात सुरक्षेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांवर प्रामुख्याने भर देण्यात आला. काम सुरू असताना रस्त्यावरील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी योग्य पर्यायी मार्गांचे नियोजन करावे, अपघात टाळण्यासाठी बांधकाम परिसरात आवश्यक ते दिशादर्शक फलक व बॅरिकेड्स लावण्यात यावेत, तसेच रात्रीच्या वेळी वाहनधारकांना स्पष्ट दिसेल अशी प्रकाश व्यवस्था चोख ठेवण्यात यावी, अशा सूचना महापौरांनी संबंधित यंत्रणेला दिल्या.



यासोबतच बांधकामामुळे उडणाऱ्या धुळीचा त्रास नागरिकांना होऊ नये यासाठी दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले.

या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीस उपमहापौर दीपकसिंह रावत, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अजितपालसिंघ संधू, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता रामदास खलसे, कंत्राटदार कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर लॅवेंडर सिंग सिरोही, अथॉरिटी इंजिनियर देशमाने, महानगरपालिकेचे नगरसेवक मो. मसूद अहेमद खान, गटनेता स. मुजीब, अ. लतीफ अ. माजीद, सुमित मुथा, मो.नासेर अहेमद आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत उपस्थित नगरसेवकांनी बांधकाम परिसरात नागरिकांना येणाऱ्या संभाव्य अडचणी मांडल्या. एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी पुलाच्या कामाच्या सद्यस्थितीची आणि प्रगतीची माहिती सादर करत, लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या सर्व सुरक्षात्मक उपाययोजनांची आणि खबरदारीची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही दिली. महानगरपालिका आणि एमएसआरडीसी यांच्यात योग्य समन्वय राखून हे काम वेळेत व सुरक्षितपणे पूर्ण करण्याचा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

पुलाच्या कामात विविध विभागांचा ताळमेळ राहण्यासाठी एक विशेष 'समन्वय समिती' स्थापन करण्यात यावी. या समितीमध्ये महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी, त्या भागातील नगरसेवक, पोलीस प्रशासन आणि महावितरणच्या अधिकाऱ्यांचा समावेश करावा. तसेच प्रकल्पाचे नियोजन आणि कामाची रूपरेषा समजून घेण्यासाठी पुढील ८ दिवसांच्या आत संपूर्ण कामाचे 'पीपीटी' स्वरूपात सविस्तर सादरीकरण सादर करावे. पीपीटी सादरीकरण झाल्यानंतर सर्व संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी व समिती सदस्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन संयुक्त पाहणी करावी, जेणेकरून जमिनीवरील वस्तुस्थितीनुसार पुढील निर्णय घेता येतील.

# ड्रोनद्वारे पीक फवारणीचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)-** कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून उत्पादन खर्च कमी करणे, वेळेची बचत करणे तसेच शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यासाठी कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ड्रोनद्वारे पीक फवारणी तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्यात येत आहे. नांदेड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी या आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी केले आहे.

ड्रोनद्वारे फवारणीमुळे पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत कमी वेळेत मोठ्या क्षेत्रावर फवारणी करता येते. कीटकनाशके, बुरशीनाशके किंवा इतर कृषी निविष्ठांची फवारणी करताना शेतकऱ्यांचा औषधांशी थेट संपर्क कमी होत असल्याने सुरक्षिततेच्या दृष्टीनेही हा पर्याय उपयुक्त आहे. पिकांमध्ये प्रत्यक्ष प्रवेशाची आवश्यकता नसल्याने पिकांची होणारी नासधूस टाळता येते. ऊस, कापूस, सोयाबीन, तूर, हरभरा, गहू, भाजीपाला, फळबाग तसेच वाढलेली पिके व दाट पिकांसाठी ड्रोन फवारणी उपयुक्त ठरते.

कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत किसान ड्रोन या घटकासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पभूधारक शेतकरी बांधवांना ड्रोनच्या मूळ किमतीच्या ५० टक्के किंवा ५ लाख रुपये, तर सर्वसाधारण व बहुभूधारक शेतकऱ्यांना मूळ किमतीच्या ४० टक्के किंवा ४ लाख रुपयांपर्यंत, यापैकी जी रक्कम कमी असेल ती अनुदान म्हणून देण्यात येते. शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा. ड्रोन फवारणी करताना संबंधित पिकासाठी शिफारस केलेली कृषी निविष्ठा, योग्य प्रमाण व शिफारस केलेल्या फवारणीची वेळ यांचे पालन करणे आवश्यक आहे. ड्रोन फवारणीचे प्रशिक्षण कृषी विज्ञान केंद्र, सगरोळी येथे दिले जाते व प्रशिक्षणानंतर ड्रोन चालविण्याबाबत प्रमाणपत्र देण्यात येते. अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## नावघाट पुलावरून उडी घेऊन आत्महत्या

**नांदेड (प्रतिनिधी)-** शहरातील नावघाट पुलावरून गोदावरी नदीपात्रात उडी घेऊन कामाजी गंगाधर तिडके (वय ३५, रा. बोंढार हवेली) यांनी आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी दुपारी चारच्या सुमारास घडली. कामाजी तिडके हे आ. आनंदराव तिडके बोंढारकर यांचे चुलत भाऊ असल्याचे सांगण्यात आले. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून, पुलावर सुरक्षा जाळी नसल्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## 'वेलनेस स्पा'मध्ये देहव्यापाराचा पर्दाफाश; नेपाळसह परराज्यातील ७ तरुणींची सुटका, ३ आरोपी जेरबंद

**नांदेड (प्रतिनिधी)-** मसाजच्या नावाखाली सुरू असलेल्या कुंटणखान्यावर पोलिसांनी छापा टाकून आंतरराज्यीय देहव्यापार रॅकेट उद्ध्वस्त केले आहे. फुले मार्केट परिसरातील 'वेलनेस स्पा' सेंटरवर टाकलेल्या छाप्यात नेपाळसह परराज्यातील ७ पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांना फुले मार्केट रस्त्यावरील 'वेलनेस स्पा'मध्ये अवैध देहव्यापार चालत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यांच्या आदेशाने स्थानिक गुन्हे



शाखेचे पो. नि. अतुल भोसले यांच्या नेतृत्वात एएचटीयू पथक तयार करण्यात आले.

पोलिसांनी दोन शासकीय पंच आणि एक बोगस ग्राहक तयार केला. बोगस ग्राहकाला क्रमांक नोंदवलेल्या ५०० रुपयांच्या ८ नोटा (एकूण ४ हजार रुपये) देण्यात आल्या.

दि. १ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री बोगस ग्राहकाला स्पामध्ये पाठवण्यात आले. त्याने इशारा देताच पथकाने छापा मारला. बोगस ग्राहकाने मॅनेजरला २ हजार रुपये आणि खोलीतील महिलेला २ हजार रुपये दिल्याचे निष्पन्न झाले. पंचांसमक्ष त्या चिन्हांकित नोटा जप्त करण्यात आल्या.

घटनास्थळावर सापडलेल्या नेपाळ, नागालँड, नवी दिल्ली, ठाणे व पुणे येथील एकूण ७ महिलांची सुटका केली.

पोलीस पथकाने हिफजुर रहेमान आरिफउद्दीन, वय २०, रा. होजाई, नागाव, आसाम मॅनेजर, रहाजउद्दीन रफीकउद्दीन, वय २०, रा. होजाई, आसाम आणि याहीया अहमद अब्दुल वाहीद, वय १९, रा. होजाई, आसाम यांना अटक केली असून मुख्य मालक संतोष बघे हा फरार झाला आहे. त्याचा शोध पोलीस घेत आहेत.

## पोलिसांचे जुगार अड्ड्यांवर छापे; २२ जुगारी ताब्यात, ५.९२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)-** पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेत नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या आदेशावरून त्यांच्या पथकांनी दोन ठिकाणी छापे टाकून २२ जणांविरुद्ध जुगाराचा गुन्हा दाखल केला असून, ५ लाख ९२ हजार ९९० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी हडको येथील दादाराव जाधव यांच्या फार्म हाऊसजवळ तिर्रट जुगार सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी छापा टाकला.

यात काळबा गिरडे, राम मोरे, अरुण लोहकरे, हरीदास पुयड, दीपक खैरे, शाम गिरे, शेख साजिद, किशन घोगरे, श्रीकांत इंगेवाड, दत्ता पवार, काळेश्वर मोरे, दादाराव जाधव, सर्जेराव खैरे व इतर २ जण असे १५ जण आढळले. त्यांच्याकडून रोख २३ हजार २९० रुपये, १२ मोबाईल १ लाख ४८ हजार रुपये, ५ मोटारसायकली ३ लाख ५५ हजार रुपये व जुगार साहित्य असा एकूण ५ लाख २६ हजार २९० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नांदेड ग्रामीण पो. ठा. गु.र.नं. ११०३/२०२६ अन्वये गुन्हा दाखल झाला



आहे.

दि. १ सप्टेंबर रोजी वाजेगाव येथे गुरुराज चांडोळकर यांच्या शेताजवळ जुगार सुरू असल्याच्या माहितीवरून पोलिसांनी कारवाई केली. यात बालाजी सोनटक्के, सुभाष पवार, किशोर शिंदे, सलमान शेख, विलास गायकवाड, शंकर जंगमपेलवाड, सुनील ठाकूर या ७ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून रोख १ हजार ७०० रुपये व MH-26-BM-2654 क्रमांकाची मोटारसायकल ६५ हजार रुपये असा एकूण ६६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. गु.र.नं. १०९६/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध जुगार व मटक्याविरोधात कारवाई सुरूच राहणार असून माहिती देण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## अखेर किनवटच्या पोलीस निरीक्षकांची उचलबांगडी; जगदीश मंडलवार यांच्याकडे पदभार

### पीडित महिलेचे उपोषण समाप्त

**किनवट (प्रतिनिधी)-** विनयभंग-प्रकरणात गुन्हा दाखल करण्यास विलंब केल्याप्रकरणी एका पीडित आदिवासी महिलेने सुरु केलेल्या आमरण उपोषणाची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षकांनी किनवटचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांची येथून उचलबांगडी करीत त्यांना पोलीस नियंत्रण कक्षात संलग्न केले आहे. त्यानंतर इतर मागण्यांबाबत लेखी आश्वासन मिळाल्याने पीडित महिलेने बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी आमरण उपोषण व आत्मदहन मागे घेतले आहे.

गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात दि. २० ऑगस्ट रोजी एका आदिवासी महिलेचा विनयभंग झाला होता. या प्रकरणात पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी गुन्हा दाखल करण्यास विलंब केल्याच्या कारणावरून पीडित महिलेने पोलीस निरीक्षक कराड यांना निलंबित करून या गुन्ह्यात



त्यांच्यासह गुन्हा मागे घेण्यासाठी दबाव टाकणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा, या मागणीसाठी दि. १ सप्टेंबरपासून किनवटच्या उपविभागीय दंडाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणाला सुरुवात केली होती. मागण्यांची पूर्तता न झाल्यास बुधवार, दि.२ रोजी आदिवासी समाजबांधवांच्या उपस्थितीत आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता.

या आंदोलनाची दखल घेत जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी मंगळवारी रात्री उशिरा पोलीस निरीक्षक गणेश कराड यांची पोलीस नियंत्रण कक्षात बदली केली. त्यांच्या जागी जगदीश मंडलवार यांची तातडीने नियुक्ती करण्यात आली.दरम्यान, बुधवारी दुपारी उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम व नवे पोलीस निरीक्षक मंडलवार यांनी उपोषणस्थळी भेट दिली. निवेदनातील मागण्यांपैकी पोलीस निरीक्षक कराड यांची बदली ही मुख्य मागणी मान्य झाली असल्याने उपोषण, आत्मदहन मागे घेण्याचे आवाहन त्यांनी पीडित महिलेसह आदिवासी समाजाच्या नेत्यांना केले. इतर मागण्यांसंदर्भात सखोल चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्याचे लेखी आश्वासनही कदम यांनी दिले.त्यानंतर पीडित महिलेने उपोषण मागे घेत असल्याचे जाहीर केले.या गंभीर प्रकरणात समाजबांधवांसह डीवायएसपी चंद्रशेखर कदम यांनी मोलाची साथ दिल्याचे यावेळी उपोषणकर्त्या महिलेने नमूद केले. यावेळी माजी जि. प. अध्यक्षा जनाबाई डुडुळे, माजी उपाध्यक्ष प्रकाश गब्बा राठोड यांच्यासह नागोराव गेडाम, गोपीनाथ बुलबुले, प्रा. किशन मिराशे, प्रा. विजय खुपसे, शेषराव कोवे, विश्वनाथ नखाते, डॉ. उत्तम धुमाळे, विकास कुडमुते, डॉ. जयवंत वानोळे, तुकाराम पेंदोर आदी उपस्थित होते.

## कृषी सेवा महासंघाची आजपासून टप्प्याटप्प्याने कामबंद आंदोलनाची हाक

**नांदेड (प्रतिनिधी)-** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने तयार केलेल्या अपारदर्शक आणि अतांत्रिक प्रस्तावित आकृतीबंधाविरोधात महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाने तीव्र संताप व्यक्त केला आहे. या आकृतीबंधामुळे शेतकरी, कृषी विद्यार्थी व तांत्रिक अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या हिताला बाधा पोहोचत असल्याचा आरोप करत महासंघाच्या वतीने उद्या दिनांक ३ सप्टेंबर २०२६ पासून राज्यव्यापी 'लेखणी बंद' आंदोलन पुकारण्यात आले आहे.

या आंदोलनामुळे राज्यातील कृषी विभागाचे सर्व अहवाल संकलन व प्रशासकीय कामकाज ठप्प होण्याची शक्यता आहे. महासंघाने यापूर्वी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच कृषी



मंत्र्यांकडे निवेदने देऊनही आणि कृषी महासंघाची कृषी आयुक्त यांच्या दि. २८ ऑगस्टच्या व सचिव कृषी यांच्या ३१ ऑगस्टच्या बैठकीत योग्य ती बाजू मांडूनही प्रशासनाने दखल न घेतल्याचे आक्षेप नोंदवत हे राज्यव्यापी तीव्र आंदोलन हाती घेतले आहे.

सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी सामूहिक रजा देऊन कृषी आयुक्त कार्यालय पुणे येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात संजय चातरमल, पुनम चातरमल, सुनील सानप, दीपक नागुरे, विनोद देशमुख, सोनाली शिंदे, लक्ष्मण चचुवार, सुप्रिया शिंदे, वसंत जारीकोटे, दत्ता भुते, विजयकुमार पाटील, बालाजी होणवडजकर, कैलास पेरके, प्रल्हाद येवते, संभाजी वाघमारे, अश्विनी वासलवार, अर्चना मोरे, विनिता सर्वज्ञ, सलमा बेगम पाळेकर, माधुरी राजूरकर, सुरेखा शिंदे, सविता जारिकोटे, दीपाली मोरे, वनमाला मोरताडे, गंगासागर क्षीरसागर आदीसह सर्व तांत्रिक संवर्ग संघटनेचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत.

## रेशमाजी हंबर्डे यांचे निधन; आज अंत्यविधी

**नांदेड (प्रतिनिधी)-** लोहा तालुक्यातील वाका येथील रहिवासी रेशमाजी गोपाळ हंबर्डे यांचे वृद्धापकाळाने बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी दुपारी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, सून, दोन मुली, एक जावई, नातवंडे असा परिवार असून ते येथील शेतकरी आनंदा हंबर्डे यांचे वडील होत.

# कृषिभूषण डॉ. उत्तमराव इंगळे यांचे निधन

## परभणी येथे आज अंत्यसंस्कार



**परभणी / नांदेड (प्रतिनिधी)-** हदगाव तालुक्यातील उमरी (खुर्द) येथील मूळ रहिवासी, कृषी शिक्षण व संशोधन क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणारे मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीच्या विस्तार शिक्षण संचालनालयाचे माजी संचालक कृषिभूषण डॉ. उत्तम माधवराव इंगळे यांचे बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता, परभणी येथील त्यांच्या निवासस्थानी वृद्धापकाळामुळे निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर उद्या गुरुवारी हिंदू स्मशानभूमी तलरेजा टॉकीजच्या मागे जिंतूर रोड परभणी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने कृषी शिक्षण, संशोधन व विस्तार क्षेत्रातील एक ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे.

> हदगाव तालुक्यातील नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कृषी शिक्षण, संशोधन आणि कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून प्रगतीची दिशा दाखवणारे डॉ. उत्तमराव इंगळे यांच्या निधनाने मराठवाड्याचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले.
>
> **-खा. नागेश पाटील आष्टीकर**

> डॉ. उत्तमराव इंगळे यांनी शेती संशोधनात केलेले कार्य उल्लेखनीय आहे. त्यांचे योगदान मराठवाड्यातील शेतकरी कधीही विसरणार नाहीत. त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबासह संपूर्ण कृषी क्षेत्राची व त्यावर अवलंबून असलेल्या शेतकरी वर्गाची अपरिमित हानी झाली आहे.
>
> **-आ. बाबुराव कदम**

डॉ. उत्तमराव इंगळे यांचा जन्म २५ जून १९४२ रोजी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या मूळ गावी उमरी खुर्द येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. पुढे त्यांनी कृषी विषयात उच्च शिक्षण घेत बी.एस्सी. (कृषी) १९६४, एम.एस्सी. (कृषी) १९६६ आणि पीएच.डी. १९७० या पदव्या संपादन केल्या.

## व्हॉइस ऑफ मीडियाच्या डिजिटल विंगच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी शेख याहीया



**नांदेड (प्रतिनिधी)-** व्हॉईस ऑफ मीडियाच्या डिजिटल विंगच्या जिल्हाध्यक्षपदी शेख याहीया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष अनिल मस्के व मराठवाडा अध्यक्ष गणेश जोशी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

पत्रकार शेख याहीया हे १९ वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, त्यांना यापूर्वी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तर मागील १० वर्षांपासून त्यांनी युट्युब चॅनेल सुरू केले असून, या माध्यमातून त्यांनी अनेकांच्या अडचणी सोडवल्या आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी त्यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे तर हे नियुक्तीपत्र त्यांना नुकतेच प्रदान करण्यात आले.

यावेळी ईशान खान (जिल्हा उपाध्यक्ष), विठ्ठल पवार ग्रामीण (जिल्हा उपाध्यक्ष ग्रामीण), निळकंठ जाधव, दिगंबर शिंदे (जिल्हा सचिव), स्वाती सोनकांबळे (जिल्हा कोषाध्यक्ष), अविनाश प्रघाणे (जिल्हा कार्याध्यक्ष), किशोरकुमार वागदरीकर (जिल्हा संघटक), शुभम विश्वनाथ पांचाळ (जिल्हाध्यक्ष दक्षिण), प्रवीण कुमार शेलूकर (जिल्हाध्यक्ष उत्तर), भारत चंदर सूर्यवंशी (महानगराध्यक्ष), वेदांत कोंडावार (जिल्हा सहसचिव), मोहम्मद अली खान (जिल्हा सहसचिव), प्रा. राज गायकवाड (प्रसिद्धीप्रमुख), (सदस्य) सय्यद मुमताज अली, शेख बशीर लाला, सय्यद अश्फाक आदी उपस्थित होते.

# हायवाच्या धडकेत महिलेचा जागीच मृत्यू; वडील व मुलगी गंभीर जखमी

## कृष्णूरजवळ डिझायर कारला टिपरची जोरदार धडक; चालक-मालक फरार

**नायगाव (प्रतिनिधी)-** नायगाव तालुक्यातील कृष्णूर औद्योगिक वसाहतीजवळ मैदा मिल परिसरातील सर्व्हिस रोडवर मंगळवारी दि. १ रोजी रात्री साडेआठ ते नऊच्या सुमारास हायवा टिपरने मारुती सुझुकी डिझायर कारला जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात वडील आणि त्यांची १७ वर्षीय मुलगी गंभीर जखमी झाली आहे. हायवा चालकाच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देगलूरकडून नांदेडच्या दिशेने रुग्णाला घेऊन जाणारी मारुती सुझुकी डिझायर कार (क्र. एमएच ४८ एसी ९२६३) कृष्णूर औद्योगिक वसाहतीजवळून जात असताना हायवा टिपर



(क्र. एमएच १२ आर एन ९३२३) याने कारला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता एवढी होती की, कारमधील उज्ज्वला दिलीप नगरे वय ५० वर्षे रा. धनगरवाडी, ता. देगलूर यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात दिलीप विनायक नगरे वय ४५ वर्षे आणि त्यांची मुलगी ऋतुजा दिलीप नगरे वय १७ वर्षे हे दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com